# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक ०४ एप्रिल, २०१६ / चैत्र १५, १९३८ ( शके )**

**(१) महसूल, पुनर्वसन व मदत कार्य, भूकंप पुनर्वसन, अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ, कृषी आणि फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय, राज्य उत्पादन शुल्क मंत्री**
**(२) परिवहन मंत्री**
**(३) ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा मंत्री**

**यांचे प्रभारी विभाग**

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ५७**

---

### मौजे येलकी (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) येथील जमीन बौध्द समाजाच्या नांवे करण्याबाबत

**(१) * १५९७२ श्री.रामराव वडकुते, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे येलकी (ता.कळमनुरी, जि.हिंगोली) येथील गायरान जमिनीवरील सर्व्हे नं. १९ व ३० वर सन १९७० पासून बौध्द समाजाचे नागरिक राहत असून त्यांचे नावे सदर जागा करण्याचे आदेश जिल्हाधिकारी, हिंगोली यांनी तहसिलदार, कळमनुरी यांना देऊन सदर नागरिकांच्या नावे सदर जमीन करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) मौजे येलकी, ता.कळमनुरी, जि.हिंगोली येथील जुना सर्व्हे नंबर १९ मधील २ हे जमीन अतिक्रमण नियमानुकूल करुन श्री.धोंडा मशा यांना वाटप केल्याबाबत १९७९ साली उपविभागीय अधिकारी, हिंगोली यांनी आदेश काढले होते. सदर आदेशातील अटी व शर्तीनुसार संबंधितांनी आकारणीच्या सहा पट रक्कम शासनाकडे जमा करणे आवश्यक होते. तसेच नमुना क्र.१४ मधील करारनामा करुन देणे अपेक्षित होते. मात्र संबंधितांनी या अटी व शर्तीचे पालन केलेले नसल्याने संबंधित आदेशाचा गा.न.नं.७/१२ सदरी अंमल झालेला दिसून येत नाही.

तद्‌नंतर मौ.येलकी, ता.कळमनूरी, जि.हिंगोली येथील जुना स.नं.१९ (सद्याचा गट नं.११३) व गट क्र.११२ मधील ३० हे. ३१ आर जमीन सशस्त्र सीमा बल, गृह मंत्रालय, भारत सरकार यांना प्रदान करण्यात आलेली असून दि.३१.०५.२०१३ रोजी सदर जमिनीचा ताबा देखील देण्यात आला आहे. सदर जमीन प्रदानाकरिता निर्बाध्यरित्या उपलब्ध होती. त्यावेळीच्या पंचनाम्यानुसार या जमिनीवर कोणतेही अतिक्रमण आढळून आलेले नाही.

तसेच मौ.येलकी, ता.कळमनूरी, जि.हिंगोली येथील जुना स.नं. ३० (सद्याचा गट नं.१४७) मध्ये श्री.पूरभाजी ग्यानवा यांचे अतिक्रमण आहे. ते नियमानुकूल करण्यास पात्र नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**येवला येथील बस स्थानक आणि आगार व्यवस्थापक निवासस्थानासह व्यापारी संकुल बांधण्याबाबत**

**(२) * १४९५४ श्री.जयवंतराव जाधव : तारांकित प्रश्न क्रमांक ८०५३ ला दिनांक १६ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला येथील बस स्थानक आणि आगार व्यवस्थापक निवासस्थानासह व्यापारी संकुल बांधण्याच्या बी.ओ.टी. तत्वावरील कामास शासनाने दिनांक २६ ऑगस्ट, २०१४ रोजी वा त्यासुमारास मंजुरी देवूनही माहे मे, २०१५ पर्यंत सदर काम सुरू झालेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बसस्थानकाची अत्यंत दुरवस्था झालेली असल्यामुळे प्रवाशांच्या सोयीसाठी या स्थानकाच्या आधुनिकीकरणाचे काम हाती घेण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक २६ ऑगस्ट, २०१४ रोजी शासनाने मंजुरी दिलेले काम सुरु करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच बी.ओ.टी. तत्वावर सदर काम न करण्याबाबत शासनाचा विचार असल्यास सदर कामासाठी शासनस्तरावरुन अनुदान मंजुर करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) होय.
(२), (३) व (४) येवला येथील बसस्थानकातील पायाभुत सुविधा सुस्थितीत आहेत. येवला येथील बांधा, वापरा, हस्तांतरीत करा (BOT) बस स्थानकासंदर्भात छोट्या गाळाधारकांची बांधकामे पाडण्याची कारवाई सुरु करण्यात आली होती. त्याचवेळी हिवाळी अधिवेशन - २०१४ मध्ये स्थानिक विधानसभा सदस्य यांनी केलेल्या विनंतीस अनुसरुन सदरील प्रकरणी तात्पुरती स्थगिती देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे सताळा (ता.उदगीर, जि.लातूर) येथील जमिनीचे शेतकऱ्यांना विभाजन करून देण्याबाबत

**(३) * १५०४६ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे सताळा (ता.उदगीर, जि.लातूर) येथील गट नं. ११२ व ११६ मधील जमिनीचे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम ८५ प्रमाणे शेतकऱ्यांना विभाजन करून देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, लातूर यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हाधिकारी, लातूर यांनी आदेश देऊनही उपविभागीय अधिकारी व तहसिलदार, उदगीर यांनी विहित मुदतीत कारवाई न करता शेतकऱ्यांची अडवणुक केल्यावरून त्यांच्याविरुध्द निलंबनाची कारवाई करण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी सन २०१६ मध्ये वा त्या दरम्यान प्रधान सचिव, महसूल यांच्याकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार संबंधित अधिकाऱ्यांविरूध्द कारवाई करण्याबाबत व शेतकऱ्यांना न्याय देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३), (४) व (५) जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधींनी दि. ०४.०६.२०१४ रोजी ता.उदगीर येथील गट नं.११२ व ११६ मधील जमिनीचे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ८५ प्रमाणे सहधारकांना हिस्याचे विभाजन करुन देण्याबाबत जिल्हाधिकारी, लातुर यांना निवेदन दिले होते.

सदर निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, लातूर यांनी दिनांक ०६.०६.२०१४ च्या पत्रान्वये तहसिलदार, उदगीर यांना कलम ८५ प्रमाणे विभाजनाची व चतु:सिमा निश्चितीची कार्यवाही करण्याबाबत कळविले आहे. तसेच लोकप्रतिनिधींचे सदर निवेदन मा.राज्यमंत्री (महसूल) यांच्याकडूनही पृष्ठांकनासह प्राप्त झाल्यावर सदर प्रकरणासंदर्भात योग्य ती कार्यवाही करणेबाबत उपविभागीय अधिकारी, उदगीर व तहसिलदार, उदगीर यांना जिल्हाधिकारी, लातूर यांच्या दि. ११.०८.२०१४ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. त्यानुसार तहसिलदार, उदगीर यांनी दि. २२.०८.२०१४ च्या पत्रान्वये उपअधिक्षक भुमि अभिलेख, उदगीर यांना पुढील कार्यवाही करण्याबाबत कळविले आहे.

त्यानुषंगाने उप अधिक्षक भूमि अभिलेख, उदगीर यांनी दि.०७.१०.२०१४ च्या पत्रान्वये मुळ अर्जदारास या प्रकरणात कलम ८५ (२) चे आदेश पारीत झाले नसून, गट नं.११२ व ११६ मधील सर्व सहधारकांच्या संमतीने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ८७ अन्वये पोटहिस्सा मोजणीची कार्यवाही प्रस्तावीत करता येते व त्याअन्वये ताबे वहिवाटी हिस्याप्रमाणे पोट हिस्सा कार्यवाही करुन महसूली अधिकारी किंवा तहसिलदार यांचेकडे अंमल करण्याकरीता सादर करण्यात येते आणि त्याकरीता प्रस्तुत प्रकरणी याबाबत कार्यवाही करावयाची असल्यास गा.न.नं.७/१२ उतारे व सर्वांचे संमतीपत्र सादर करावे असे मूळ अर्जदारास कळविलेले आहे. तसेच तहसिलदार, उदगीर यांनी सुध्दा अर्जदार यांना दि.२७.१०.२०१४ च्या पत्रान्वये नमूद दस्तऐवज उपलब्ध करुन देण्याबाबत कळविलेले आहे. तथापि, अर्जदार यांनी दि. २४.०२.२०१६ पर्यंत

उप अधीक्षक भूमि अभिलेख, उदगीर यांच्याकडे सहहिस्सेदारांची नावे, पत्ते आणि त्यांच्या हिश्श्याची व्याप्ती व त्यासंबंधी कच्चा नकाशा सादर केलेला नव्हता.

या प्रकरणी अंतिम कार्यवाही न झाल्याने परभणी-हिंगोली जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, उप विभागीय अधिकारी व तहसिलदार यांचेविरुध्द कार्यवाही करण्याबाबत प्रधान सचिव (महसूल) यांचेकडे फेब्रुवारी, २०१६ मध्ये पत्र प्राप्त झाले आहे. दरम्यान, संबंधित शेतक-यांनी घरगुती वाटपपत्राद्वारे जमिनीची वाटणी करुन घेतली असल्याने त्या आधारे पोट हिस्सा मोजणीबाबत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

**बिंदू वायु (ऊर्जा) प्रा.लि. या कंपनीने मुद्रांक शुल्क बुडविल्याबाबत**

**(४) * १५९३२ श्री.अमरसिंह पंडित, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.रामराव वडकुते, श्री.सतिश चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.धनंजय मुंडे : तारांकित प्रश्न क्रमांक ३६६४ ला दिनांक १० मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बिंदू वायु (ऊर्जा) प्रा.लि. या कंपणीने दिनांक २९ जून, २०१३ रोजी दस्त क्रमांक ४५५५/१३ नुसार दुय्यम निबंधक, सिन्नर, जि.नाशिक यांच्या कार्यालयात सुमारे रुपये ८०४ कोटी किंमतीचे गहाणखत करतांना अधिकाऱ्यांशी संगनमत करून सुमारे रुपये ४० कोटींचा मुद्रांक शुल्क बुडविला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी लोकप्रतिनिधी यांनी मुद्रांक नियंत्रक, पुणे यांच्यासह आदींना या प्रकरणाची तक्रार देऊन दोषीविरुध्द कारवाईची मागणी केली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मा.मंत्री, महसुल यांनी विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात सदर प्रकरणी उच्चस्तरीत चौकशी करण्याचे आश्वासित केल्यानुसार याबाबतची चौकशी पुर्ण झाली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष कोणते आहेत,

(४) बिंदू वायु (ऊर्जा) या सह मैत्राह वायु (कृष्णा) प्रा.लि.अशा किती कंपन्यांनी राज्यभरात शासनाचा मुद्रांक शुल्क बुडविला आहे, अशा दोषी कंपन्यांविरुध्द शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

सदर कंपनीने रुपये ३६.०६ कोटीचे मुद्रांक शुल्क कमी भरले आहे. तथापि, अधिकाऱ्यांशी संगनमत केले हे खरे नाही.

(२) व (३) होय. सदर प्रकरणाची नोंदणी महानिरीक्षक यांचेस्तरावर चौकशी करण्यात आली असून त्यामध्ये अधिकाऱ्यांशी संगनमत केले नसल्याचे आढळून आले आहे. पक्षकारांनी महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील तरतूदीनुसार नोंदणी महानिरीक्षक यांचेकडे अपील केले असून त्यावर अर्धन्यायिक तत्वानुसार कार्यवाही सुरु आहे.

(४) अशी विशिष्ट प्रकारची प्रकरणे आढळून आलेली नाहीत. तथापि, अशा प्रकारची प्रकरणे आढळून आल्यास, महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमातील कलम ३३ च्या तरतूदीनुसार वसूलीची कार्यवाही करणेत येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील एसटी महामंडळाच्या जागेत असलेली उपहारगृहे, रसवंतीगृहे फळविक्रीची दुकाने व अन्य दुकाने महिला बचत गटांना देण्याबाबत**

**(५) * १५७७४ श्री.संदिप बाजोरिया, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, ॲड.जयदेव गायकवाड, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.रामराव वडकुते, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुंबई, पुणे, कोल्हापूर, औरंगाबाद, अहमदनगर, सातारा, यवतमाळ, नागपूर या महत्वाच्या शहरांबरोबर सर्व जिल्हयांच्या व तालुक्याच्या ठिकाणांसह एकूण ६००० बस स्थानकांवरील एसटी महामंडळाच्या जागेत असलेली उपहारगृहे, रसवंतीगृहे, फळविक्रीची दुकाने व अन्य दुकाने महिला बचत गटांना देण्याचा व सध्या असलेल्या उपहारगृहांना मुदतवाढ न देण्याचा निर्णय व आदेश माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान मा.परिवहन मंत्री व एसटी महामंडळाचे अध्यक्ष यांनी घोषित केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या स्वरुपाचा अध्यादेश काढून त्याची अंमलबजावणी करण्याबाबतच्या सूचना राज्यातील सर्व परिवहन विभागांना पाठविण्यात येऊन, अंमलबजावणी करण्याबाबत सांगण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निर्णयाची अंमलबजावणी राज्यातील परिवहन विभागाच्या किती विभागातील व किती बस स्थानकांवर सुरु करण्यात आली आहे,

(४) उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे अंशत: खरे आहे.

राज्य परिवहन महामंडळाच्या बसस्थानकावरील केवळ रिक्त उपहारगृहांचे वाटप महिला बचत गटांना महामंडळाच्या निविदा प्रक्रियेद्वारे देणेबाबतचा निर्णय राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर घेण्यात आलेला आहे.

(२) राज्य परिवहन बसस्थानकांवरील रिक्त उपहारगृहांचे वाटप महिला बचत गटांना करण्याकरिता राज्य परिवहन महामंडळाद्वारा दिनांक २२.२.२०१६ च्या परिपत्रकान्वये सर्व प्रादेशिक व विभागीय कार्यालयांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) सद्य:स्थितीत राज्यभरातील एकूण १९ विभागातील एकूण ३८ बसस्थानकांवरील रिक्त उपहारगृहाकरिता अंमलबजावणी करण्याची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर कार्यवाहीखाली आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात दुष्काळग्रस्त भागात चारा छावण्या सुरु करण्याबाबत**

**(६) * १४७३५ श्री.संजय दत्त, डॉ.अपूर्व हिरे, श्री.अमरिशभाई पटेल, श्री.हरिसिंग राठोड, श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुभाष झांबड, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.रामराव वडकुते, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विशेषत: देवळा (जि.नाशिक) तालुक्यातील खामखेडा परिसरात व कोल्हापूर येथे खरीप हंगामात पाऊस कमी पडल्याने भात व आणि नाचणीच्या पिकाखालील क्षेत्र कमी झाले असून रब्बी हंगामातील मका व ज्वारीचे क्षेत्रही घटल्याने जिल्ह्यात जनावरांचा चाऱ्याचा व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होऊन दुष्काळग्रस्त परिस्थिती निर्माण झाली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने अध्यादेश काढूनही मराठवाड्यात सुमारे ३३ चारा छावण्या मंजूर होऊनही केवळ ९ चारा छावण्या सुरु झाल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जनावरांचा चाऱ्याचा व पाण्याचा प्रश्न बिकट असताना बीड, उस्मानाबाद, लातूर या जिल्हयांमध्ये चारा छावण्या सुरु करण्याची परवानगी देऊन व तसे प्रस्तावही प्रशासकीय पातळीवरुन मागवूनही अद्याप पर्यंत चारा छावण्या सुरु झाल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जनावरांसाठी चारा छावण्या उभारण्याबाबत लोकप्रतिनिधी व नागरिकांनी मा.पशुसंवर्धन मंत्री यांचेकडे मागणी केल्याचे तसेच, चारा छावण्या उभारण्याबाबत शेतकऱ्यांनी आंदोलन केल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाकडून गायी व म्हशी यांच्या कृत्रिम रेतनात दुप्पट वाढ केल्याचा प्रकार माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या सुमारास निदर्शनास आला हे ही, खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाकडे विभागनिहाय किती प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत व शासनाने चारा छावण्या सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) दिनांक २२.३.२०१६ अखेर औरंगाबाद विभागात ३६१ चारा छावण्यांना मंजूरी देण्यात आली असून प्रत्यक्षात बीड जिल्हयात २३७, लातूर जिल्हयात ३ व उस्मानाबाद जिल्हयात ८७ अशा एकूण ३२७ चारा छावण्या सुरु आहेत.

(४) औरंगाबाद विभागातील उस्मानाबाद जिल्हयामध्ये चारा छावणी मंजूरी संदर्भात आंदोलने झालेली आहेत. मात्र सदर आंदोलने ही आवश्यकतेपेक्षा जास्त चारा छावण्या मंजूर करण्यासंदर्भात असल्याचे जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांनी नमूद केले आहे.

(५) पशुसंवर्धन विभागाच्या दिनांक १४.९.२०१५ च्या शासन निर्णयान्वये कृत्रिम रेतन सेवाशुल्क रु. ४०/- करण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील शेतकऱ्यांना पेन्शन योजना लागू करण्याबाबत

**(७) * १४९९४ ॲड.निरंजन डावखरे : तारांकित प्रश्न क्रमांक ११९०१ ला दिनांक ८ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेतकऱ्यांना वृध्दापकाळात आधार म्हणून उत्तरप्रदेश, कर्नाटक, केरळ, गोवा, पश्चिम बंगाल, तामिळनाडू आदी ९ राज्यांच्या धर्तीवर शेतकऱ्यांना रुपये २००० पेन्शन योजना सेवा सुरु करावी व आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांच्या कुटुंबियांचे पुनर्वसन करावे अशा आशयाचे निवेदन राज्यातील शेतकऱ्यांकडून माननीय राज्यपाल महोदयांना सादर केले असल्याचे दिनांक २६ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील शेतकऱ्यांना पेन्शन योजना सुरु करावी, या मागणीसाठी गेल्या ४ वर्षापासून राजकीय पक्षांकडून शासनाकडे आग्रही मागणी करण्यात येत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असे असताना, राज्यातील शेतकऱ्यांना पेन्शन योजना सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाचे विचाराधीन नसल्याचे शासनाने संदर्भाधिन प्रश्नास दिलेल्या उत्तराद्वारे नमूद केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, देशातील ९ पेक्षाही अधिक राज्यात शेतकरी पेन्शन योजना लागू केली असताना महाराष्ट्र शासनाने नकारात्मक भूमिका घेण्याची कारणे काय व त्याबाबतची सद्यस्थिती काय आहे ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) अशा आशयाची निवेदने प्राप्त झालेली आहेत, हे खरे आहे.

(३) शेतकऱ्यांना निवृत्तीवेतन देण्याचा शासनाने निर्णय घेतलेला नाही अथवा तसा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही. सद्यस्थितीत कृषि विभागामार्फत शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना व राष्ट्रीय कृषि विमा योजना राबविण्यात येत असून खरीप हंगाम २०१६ पासून प्रधानमंत्री फसल विमा योजना राबविण्याचे प्रस्तावित आहे. केंद्र शासनाने दि.१.६.२०१५ पासून देशातील असंघटित क्षेत्राकरीता अटल पेन्शन योजना सुरु केलेली असून ती शेतकऱ्यांसाठी उपयुक्त आहे. त्यानुषंगाने सदर योजनेत प्रचार व प्रसिध्दीच्या माध्यमातून शेतकऱ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी शासन प्रयत्नशिल आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**चंद्रपूर जिल्हयातील पैसेवारी ५० टक्के च्या आत असलेल्या दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत**

**(८) * १५२३८ श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.मितेश भांगडिया :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील १६६३ गावांची अंतिम पैसेवारी ५० टक्के च्या आत असून संपूर्ण जिल्हा दुष्काळग्रस्ताच्या छायेत असून व तसा अहवाल जिल्हाधिकारी यांनी प्रधान सचिव, महसूल यांना पाठवूनही चंद्रपूर जिल्हा दुष्काळग्रस्त जाहीर झाला नसल्याचे दिनांक २ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर जिल्हयातील पैसेवारी ५० टक्के च्या आत असल्याने सदर जिल्हा दुष्काळग्रस्त म्हणून जाहिर करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) सन २०१५ च्या खरीप हंगामात १५७४७ गावामध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थिती घोषित करण्यात आलेली आहे. दिनांक ३.११.२०१५ च्या शासन निर्णयान्वये दुष्काळ जाहीर करण्याचे निकष घोषित करण्यात आले आहेत. त्यानुसार दुष्काळ जाहीर करण्यास पात्र नसलेल्या परंतु पिक नुकसान झालेल्या अमरावती, नागपूर, औरंगाबाद, नाशिक विभागातील कापूस, नागपूर, अमरावती विभागातील सोयाबिन व नागपूर विभागातील धान पिक उत्पादक शेतकऱ्यांना दिनांक २.३.२०१६ च्या शासन निर्णयान्वये विशेष मदत जाहीर केली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## गोवंश हत्या बंदीमुळे निर्माण झालेल्या भाकड जनावरांचा प्रश्न

**(९) * १५१६९ श्री.कपिल पाटील, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गोवंश हत्याबंदी कायद्यान्वये गाय किंवा बैलांचे मांस (बीफ) खाणे, विक्री-वाहतूक करणे, बाळगणे, आयात करणे यावर बंदी घालण्याचा प्रश्न प्रलंबित असून सदर कायद्याची अंमजबजावणी होत नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गोवंश हत्या बंदीमुळे भाकड जनावरांना ऐन दुष्काळात सांभाळणे अवघड झाल्यामुळे हजारो शेतकरी अडचणीत आले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांना दुभती व भाकड जनावरे सांभाळण्यासाठी विशेष भत्ता देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, गोमांस बंदी असल्याने राज्यात गोशाळा उभारण्यासाठी केंद्र शासनाने रूपये १ कोटीचा निधी राज्य शासनाला दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, केंद्र शासनाकडून व राज्य शासनाकडून या वर्षात प्रत्येकी किती निधी राज्यात गोशाळा उभारण्यासाठी देण्यात येणार आहे,

(६) असल्यास, केंद्र शासनाकडून संपूर्ण निधी मिळण्यासाठी राज्य शासनाने कोणता पाठपुरावा केला आहे आणि केंद्र शासनाकडून मिळालेल्या निधीतून कोणकोणत्या ठिकाणी गोशाळा स्थापन करण्यात आल्या आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र प्राणी रक्षण (सुधारणा) अधिनियम, १९९५ दिनांक ४ मार्च, २०१५ प्रमाणे राज्यात गोवंश हत्या बंदी कायदा लागू आहे.

(२) हे खरे नाही.

राज्यातील दुष्काळसदृश्य परिस्थितीमुळे २५८ पशुधन छावण्या उघडण्यात आल्या असून त्यामध्ये २,३१,५०३ इतके पशुधन दाखल करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४), (५) व (६) राज्यातील ३४ जिल्ह्यामध्ये भाकड गाई व गोवंश संगोपनासाठी “गोवर्धन गोवंश रक्षा केंद्र” उभारण्यात येणार असून प्रत्येक केंद्रासाठी रु.१.०० कोटी एवढे एकवेळेमध्ये एकरकमी अनुदान देण्यात येणार आहे.

राष्ट्रीय गोकूळ मिशन या नॅशनल प्रोग्राम ऑफ बोव्हाईन ब्रिडींग ॲन्ड डेअरी डेव्हलपमेंट या कार्यक्रमांतर्गत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे एकूण ५ प्रकल्प सादर केले होते. त्यापैकी ३ प्रकल्पांना मंजूरी प्राप्त झाली आहे. या तीनही प्रकल्पांमधील उपघटकांच्या अंमलबजावणीकरीता दिनांक ३१ मार्च, २०१५ अन्वये सन २०१४-१५ मध्ये रु.९.०० कोटी निधी मंजूर केला असल्याचे केंद्र शासनाने कळविले आहे व त्यापैकी प्रत्यक्षात ८०.०० लक्ष निधी महाराष्ट्र पशुधन विकास मंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पांकरीता वितरीत केला आहे.

-----------------

## नांदेड जिल्हयातील शेतक-यांना ठिबक व तुषार सिंचन योजनेचा लाभ मिळत नसल्याबाबत

**(१०) * १५०७२ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्हयातील शेतक-यांनी ठिबक व तुषार सिंचन अनुदानासाठी ६८६३ प्रस्ताव सादर केलेले असून त्यांना लाभ मिळाला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बऱ्याच शेतकऱ्यांना ऑनलाईन प्रस्ताव भरता येत नसल्याने तसेच ऑनलाईन सेवा ही वारंवार खंडीत होत असल्याने बऱ्याच शेतकऱ्यांना सदर अनुदानाचा लाभ मिळाला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आहे,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शेतक-यांना ठिबक व तुषार सिंचनाचे लाभ मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) हे खरे नाही.

सन २०१५-१६ या वर्षात नांदेड जिल्हयातून ६८६३ ऑनलाईन अर्जाची नोंद झाली. त्यापैकी ५५७७ अर्ज पात्र ठरलेत. पात्र अर्जापैकी उपलब्ध निधीच्या मर्यादेत ३०१२ अर्जाना पूर्वसंमती देण्यात आलेली आहे. त्यापैकी १५७७ लाभार्थ्यांना रु. ३.५८ कोटी एवढ्या निधीचे वाटप करण्यात आले आहे. उर्वरीत पूर्वसंमती असलेल्या लाभार्थ्यांना अनुदान वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मराठवाडयातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मोबदला देण्याबाबत**

**(११) * १५६७२ श्री.सुभाष झांबड, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडयात ५ ते १५ वर्षात मध्यम व लघु प्रकल्पाची कामे सुरु करण्यात आली असून यातील काही प्रकल्पाचे ३० ते ९० टक्के काम झाले आहे, मात्र बाधीत शेतकऱ्यांना अजूनही भूसंपादनाचा मोबदला देण्यात आला नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना भूसंपादनाचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

भूसंपादन अधिनियम १८९४ च्या कलम ११ नुसार तसेच मा.न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे संबंधित संपादन संस्था यांना निधी मागणी केली जाते. शासनाकडून यथास्थिती, महामंडळाकडून ज्याप्रमाणे निधी उपलब्ध होतो त्या प्रमाणे मोबदला भूधारकांना अदा करण्यात येतो.

(३) दिनांक १.१.२०१४ पासून नविन भूसंपादन अधिनियम २०१३ लागू झालेला असल्यामुळे ज्याप्रकरणी नविन भूसंपादन कायद्याच्या कलम (२४) ची तरतूद लागू होते. त्या प्रकरणांत सदर कायद्याच्या कलम २६ ते ३० मधील तरतूदी प्रमाणे निवाडा रक्कमेची फेर आकारणी करण्यात येत असून त्या अनुषंगाने सदर निधीची सर्व संबंधित भूसंपादन संस्थेकडे मागणी करण्यात येत आहे. सदरचा निधी प्राप्त होताच सर्व बाधीत शेतकऱ्यांना मावेजा वाटपाची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) वरीलप्रमाणे.

-----------------

**मौजे साळीदे (ता.पेण, जि.रायगड) येथील जमिनी कुळांच्या नावे करण्याबाबत**

**(१२) * १६५३९ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे साळीदे (ता.पेण, जि.रायगड) येथील गट नं.२ च्या मोजणीला बुर्डी, साळीदे, कासू या गावातील शेतकऱ्यांनी विरोध केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तद्‌नुसार कुळ असलेल्या शेतकऱ्यांनी केलेल्या विरोधानुसार उपरोक्त जमिनी कुळांच्या नावे करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) सदर प्रकरणी मौजे साळींदे, ता.पेण, जि.रायगड येथील गट नं.२ या जमिनीची हद्दकायम मोजणी करण्यासाठी उपअधीक्षक भूमि अभिलेख, पेण कार्यालयाकडे अर्जदार श्रीमती शीला भवानीदत्त त्रिभुवनदास यांनी दि.१७.११.२०१५ रोजी अर्ज केला होता. त्यानुषंगाने अर्जदार व लगतकब्जेदार यांना दि.३०.११.२०१५ रोजी मोजणी नोटीस देऊन मोजणीची तारीख दि.०६.०१.२०१६ निश्चित करण्यात आली होती. सदर मोजणी तारखेस भूकरमापक हे प्रत्यक्ष जागेवर गेले असता, अर्जदार गैरहजर असल्यामुळे सदरची मोजणी करता आलेली नाही. तसेच याबाबत सदर जमिनीमध्ये शेती करणाऱ्या शेतकऱ्यांनी कुळ कायद्यानुसार मालकी हक्काचा दावा करुन मोजणीस प्रखर विरोध केला ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, प्रस्तुत प्रकरणी मौजे साळींदे, ता.पेण, जि.रायगड येथील गट नं.२ अ/१अ(१), २अ/१अ(२) व २अ/२(२) चे सन २०१४-२०१५ यावर्षाच्या गा.न.नं. ७/१२ (अधिकार अभिलेख) मध्ये “कुळाचे नाव” या सदरी कुळाच्या कोणत्याही नोंदी आढळून येत नाहीत.

तसेच सदर गट नं.२अ/१अ (१) ही मिळकत कुळांच्या नावे करण्याकरीता तहसिलदार, पेण यांच्याकडे कोणत्याही प्रकारचा अर्ज किंवा दावा करण्यात आलेला नाही.

-----------------

**श्री संत गजानन महाराज संस्थान शेगांव (ता.शेगांव, जि.बुलढाणा) यांना मिळालेल्या शासकीय जमीनीस कायम स्वरुपी मंजूरी देणेबाबत**

**(१३) * १६५८० श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्री संत गजानन महाराज संस्थान शेगांव (ता.शेगांव, जि.बुलढाणा) यांना शेगांव भाग २ येथील सर्व्हे नं. २२५ व २४७ मधील तलावाच्या सौंदर्यीकरणासाठी खास बाब म्हणून मिळालेल्या शासकीय जमिनीस कायम स्वरुपी मंजूरी देणेबाबतचा प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, १०१ हेक्टर क्षेत्रफळ असलेल्या या ओसाड माळरानाचे सौंदर्यीकरण करुन संस्थानाने या जागेपैकी ५५ एकर क्षेत्रफळात मोठे तलाव तयार केला असून त्यास आनंदसागर हे नाव दिले आहे, त्यामुळे या संपुर्ण परिसरातील शेगांव व लगतच्या खेडयातील जमीनीतील पाण्याची पातळी वाढली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त जमीन ही पूर्वीच्या दिनांक २२ सप्टेंबर, १९९९ च्या शासनाच्या आदेशातील अटी व शर्तीस अधीन राहून संस्थानास कायम स्वरुपी मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) शासनाचे ज्ञापन दिनांक २२/०९/१९९९ च्या अनुषंगाने श्री गजानन महाराज संस्थान, शेगाव यांना शेगाव शहराच्या मंजूर विकास आराखड्यात “तलावाचे सौंदर्यीकरण” या प्रयोजनासाठी आरक्षित मौजें शेगाव येथील सर्व्हे नं.२२५ व २४७ मधील अनुक्रमे ९४.९४ हे. आर व ६.३८ हे.आर अशी एकूण १०१.३२ हे. आर जमीन १५ वर्षाच्या कालावधीसाठी नाममात्र रुपये १/- वार्षिक भुभाडे आकारुन काही अटी/शर्तीवर मंजूर करण्यात आली होती. सदर जमिनीपैकी सुमारे ५५ एकर क्षेत्रावर तलाव विकसित केला आहे. वरीष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, बुलढाणा यांनी सादर केलेल्या अहवालानुसार शेगांव तालुक्यातील माहे ऑक्टोबर, २०१५ व माहे जानेवारी, २०१६ च्या कालावधीत घेतलेल्या निरीक्षण विहिरींच्या नोंदीच्या आधारे भूजल पातळीमध्ये पाच वर्षाच्या सरासरी भूजल पातळीशी तुलना करता वाढ झाल्याचे कळविले आहे.

सदरहू जमिनीचा भाडेपट्टा संपल्यामुळे सदर जमीन कायम स्वरुपात मंजुर व्हावी अशी मागणी संस्थानाने केलेली असून त्यानुषंगाने सदर जमीन ९९ वर्षाकरीता भाडेपट्टयाने मंजूर करण्याचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, अमरावती यांच्याकडून शासनास प्राप्त झाला असून त्यावर संबंधित विभागांशी विचार विनिमय करुन उचित निर्णय घेण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर कार्यवाही सुरू आहे.

-----------------

**रायगड जिल्हयातील दास्तान ते गव्हाण फाटा रस्त्यासाठी जमिनी संपादित केलेल्या बाधित शेतकऱ्यांना मोबदला मिळण्याबाबत**

**(१४) * १६६३१ श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील दास्तान ते गव्हाणफाटा या सहापदरी रस्त्यासाठी एन एच आय ने शेतक-यांच्या जमिनी संपादित केल्या असून रस्त्यांच्या निर्मितीनंतर टोल वसुलीचे काम जोरात सुरु असताना मागील ७ वर्षापासून टोल वसुली करुनही संबंधित शेतक-यांना जमिनीचा मोबदला अदा करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) आता एन एच आय ने डी पॉईंट ते करळ उड्डाणपूल आणि गव्हाणफाटा करळफाटा एन एच ४ बि या महामार्गावर सहा आणि आठपदरी रस्ता रुंदीकरण तयार करण्याचा प्रस्ताव केला असून, प्रकल्पग्रस्तांच्या विविध प्रलंबित मागण्यांची पूर्तता आणि मागील ७ वर्षापासून रस्त्यासाठी दिलेल्या जागेचा मोबदला बाधित झालेल्या शेतक-यांना देण्यात आलेला नसल्यामुळे जासई-आम्रमार्ग या राष्ट्रीय महामार्गाचे कोणतेही काम सुरु करु देणार नसल्याचा इशारा शेतक-यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या अधिका-यांसोबत आयोजित करण्यात आलेल्या दिनांक २४ डिसेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास झालेल्या बैठकीत दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दास्तान ते गव्हाणफाटा या सहापदरी रस्त्यासाठी एन एच आय ने ७ वर्षापूर्वी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला विनाविलंब बाधित शेतक-यांना अदा होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे अंशत: खरे आहे.

एकूण १८५ खातेदारांपैकी ११२ खातेदारांना नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्यात आली असून उर्वरित ७३ खातेदारांना भूसंपादन अधिनियम, १८९४ च्या कलम १२ (२) ची नोटीस देऊनही त्यांनी रक्कम स्वीकारलेली नाही.

(२) दिनांक २४.१२.२०१५ रोजी वा त्यादरम्यान राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणासोबत बैठक झालेली नव्हती. मात्र धुतूम, जासई आणि चिर्ले ग्रामपंचायतींमार्फत यासंबंधी एक निवेदन राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण यांच्या कार्यालयास देण्यात आले होते. त्याची प्रत त्यांनी सिडको व जेएनपीटी यांना संयुक्त कार्यवाहीसाठी पाठविली आहे.

(३) एकूण खातेदारांपैकी ७३ खातेदारांना नुकसान भरपाईची रु.२५,१४,३५२/- इतकी रक्कम भूसंपादन अधिनियम १८९४ च्या कलम १२ (२) अन्वये नोटिसा देऊनही स्वीकारलेली नाही. अशा खातेदारांनी पुन्हा नोटिसा काढून नुकसान भरपाईच्या रकमेचे वाटप करण्याची जिल्हाधिकारी, रायगड कार्यालयाने तजवीज ठेवली आहे. संबंधित खातेदारांनी रक्कम न स्वीकारल्यास जुन्या कायद्याच्या कलम ३० खाली सदर रक्कम मा.न्यायालयात जमा करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोराडी वीज प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होण्यास विलंब होत असल्याबाबत**

**(१५) * १६७४३ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.शरद रणपिसे : तारांकित प्रश्न क्रमांक १२०५१ ला दिनांक १८ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील वीजनिर्मिती क्षमता वाढविण्यासाठी महानिर्मिती कंपनीने हाती घेतलेल्या कोराडी (नागपूर) येथील १९८० मेगावॅटचा वीजप्रकल्प सन २०१४ मध्ये पूर्ण होणे अपेक्षित होते, परंतू सदरहू प्रकल्पाचे काम रखडले असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू वीज प्रकल्पाच्या कामाच्या विलंबामुळे प्रकल्पाच्या खर्चात सुमारे एक हजार कोटी रुपययांची वाढ झाल्याचा प्राथमिक अंदाज घेऊन सदरहू प्रकल्पाचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सद्यस्थितीत प्रकल्पाची सर्व कामे पूर्ण होण्याच्या मार्गावर असून, संच क्र.८ दिनांक १६.१२.२०१५ पासून वाणिज्यिक तत्वावर (COD) चालविण्यात येत आहे. तसेच संच क्रम. ९ व १० चे वाणिज्यिक संचलन (COD) अनुक्रमे मार्च, २०१६ व जून, २०१६ पर्यंत अपेक्षित आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील दाभोळ वीज प्रकल्पातून रेल्वेला वीज पुरविण्याचा निर्णय**

**(१६) * १६७८४ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त : तारांकित प्रश्न क्रमांक ११९८९ ला दिनांक ११ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील दाभोळ वीज प्रकल्पातून रेल्वेला वीज पुरविण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दाभोळ वीज प्रकल्पातून किती वीज निर्मिती होत आहे व त्यापैकी किती वीज रेल्वेला किती कालावधीसाठी देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे,

(३) असल्यास, यासाठी कोणत्या अटी व शर्ती निश्चित करण्यात आलेल्या आहेत,

(४) असल्यास, राज्याची विजेची गरज वाढतच असल्यामुळे याबाबत फेरविचार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) सदर प्रकल्पातून ५०० मे.वॅ. इतकी वीज निर्मिती होत असून सदर संपूर्ण वीजेचा पुरवठा रेल्वेस करण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या PSDF योजनेनुसार मार्च, २०१७ अखेरपर्यंत सदर वीजपुरवठा करावयाचा आहे.

(३) केंद्र शासनाच्या PSDF योजनेंतर्गत सदर प्रकल्पास पुरविल्या जाणाऱ्या नैसर्गिक वायुवरील व्हॅट, सीएसटी, प्रवेश कर व जकात यामधून पूर्णपणे सूट देणे अपेक्षित असून तसेच प्रकल्पातून निर्माण होणाऱ्या वीजेच्या वहनावरील ट्रान्समिशन चार्जेस व ट्रान्समिशन लॉसेस माफ करावयाचे आहे. तसेच वीज वितरण परवानाधारकांना वीज खरेदी करण्याची तरतूद आहे.

(४) सध्या राज्यात पुरेशी वीजनिर्मिती होत असून महावितरणच्या नियोजनानुसार सन २०२२-२३ पर्यंत अतिरिक्त वीजेची गरज नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षतेबाबत स्कूल बस धोरणाच्या अमंलबजावणीबाबत**

**(१७) * १६७८५ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाकडून विद्यार्थ्यांच्या सुरक्षतेबाबत स्कूल बस धोरण आखण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील स्कुल बस धोरणाची शासनाकडून अंमलबजावणी करण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, स्कुल व्हॅन धोरणांची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) स्कुल बस नियमावलीमध्ये स्कूल बसच्या व्याख्येमध्ये हलके मोटार वाहनांचा समावेश करण्यात आला असून यामध्ये १२ पर्यंत आसन क्षमता असलेल्या चारचाकी वाहनांचा हलक्या मोटार वाहनांचा समावेश होतो.

स्कुल बस नियमावलीची अंमलबजावणी करण्यासंदर्भात विविध प्रसार माध्यमांद्वारे सदर नियमावलीस व्यापक प्रसिध्दी देण्यात आली आहे.

परिवहन आयुक्त कार्यालयाकडून आतापर्यंत विविध उत्पादकांच्या ६८ स्कूल बस मॉडेल्सना मान्यता देण्यात आली आहे.

केवळ शालेय मुलीची वाहतुक करणाऱ्या स्कुल बसमध्ये मुलींच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने महिला सहवर्ती आवश्यक असण्याबाबतची तरतूद स्कूल बस नियमावलीमध्ये करण्यात आली आहे.

राज्यात शालेय स्तरावर परिवहन समित्यांची स्थापन करण्यात आली असून समित्यांच्या बैठकांचे नियमित आयोजन करण्यात येत असते.

राज्यातील सर्व जिल्ह्यामध्ये जिल्हा स्तरावर पोलीस आयुक्त/ पोलीस अधीक्षक यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा स्कुल बस सुरक्षितता समित्यांची स्थापना करण्यात आली असून माहे जानेवारी, २०१६ अखेर राज्यात ६५१ बैठका घेण्यात आल्या आहे.

स्कुल बस नियमाची अंमलबजावणी न करता अवैध वाहनातून विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या खाजगी व इतर वाहनांच्या विरोधात केलेल्या कारवाईचा तपशिल खालीलप्रमाणे आहे :-

| वर्ष | तपासलेली वाहने | | दोषी वाहने | | अटकावून ठेवलेली वाहने | दंड वसूली (रुपये लाखात) |
|---|---|---|---|---|---|---|
| | स्कुल बस | विद्यार्थ्यांची वाहतूक करणारी अवैध वाहने | स्कुल बस | विद्यार्थ्यांची वाहतूक करणारी अवैध वाहने | | |
| २०१२-१३ | ९०४१ | १०२६९ | २५५९ | २०१७ | १००० | ८५.५८ |
| २०१३-१४ | ६४१३ | ९५३० | २२३१ | २१२९ | ९३८ | ६९.०९ |
| २०१४-१५ | ८६७० | ८२६८ | २०१४ | २३०६ | ५१० | ६७.३७ |
| एप्रिल २०१५ ते जानेवारी २०१६ | ९३४२ | ८२९८ | २०८४ | १६४० | ७६९ | ८६.६८ |

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कृषी विद्यापीठांचे विभाजन करण्याबाबत

**(१८) * १७०८६ श्री.हरिसिंग राठोड, श्री.संजय दत्त, डॉ.सुधीर तांबे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद, डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ११८२३ ला दिनांक १८ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला व महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी या विद्यापीठाचा विस्तार लक्षात घेता, त्यांचे विभाजन करून स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करण्याच्या अनुषंगाने शासनास आर्थिक, तांत्रिक व प्रशासकीय बाबींवर मार्गदर्शन करण्यासाठी कुलगुरू डॉ.वेंकटेश्वरलू यांचे अध्यक्षतेखाली समिती नियुक्त करण्यांत आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तुत समितीस आपला अहवाल सादर करण्यासाठी दोन महिन्यांची मुदतवाढ दिल्यानंतर कामाचे स्वरुप पाहून पुनश्च: दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे काय, असल्यास, समितीने अहवालात केलेल्या शिफारशींचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे व त्यानुषंगाने पुढे कोणता निर्णय घेण्यात आला,

(४) असल्यास, या विभाजनापेक्षा विद्यापीठ सक्षमीकरणावर भर देण्याची गरज आवश्यक असल्याचे कृषी तज्ञांचे मत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या विद्यापीठाच्या विभाजनाचा फेरविचार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) होय.

(३) सदरचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून त्यावर यथोचीत कार्यवाही सुरु आहे.

(४) होय. कृषी विद्यापीठांच्या विभाजनाच्या अनुषंगाने नेमलेल्या समितीने अशा स्वरुपाच्या मताची नोंद घेतलेली आहे.

(५) व (६) विद्यापीठ विभाजनाबाबतच्या अहवालावर शासनस्तरावर यथोचीत कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## औद्योगिक प्रयोजनासाठी शेतजमीन संपादित करण्याच्या परवानीची अट काढून टाकण्याचा निर्णय

**(१९) * १७१७२ डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोणत्याही शेत जमिनीचा वापर करण्याआधी ती जमीन एन ए (अकृषिक) करण्याची कायद्यात तरतूद आहे, मात्र आता उद्योगांसाठी शेतजमीन संपादीत करण्याकरिता परवानगीची अट काढून टाकण्याच्या निर्णयामुळे शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची भिती निर्माण झाली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने उपजाऊ सुपिक शेतजमिनींचा वापर उद्योगांसाठी न करण्याच्या दृष्टीने काही धोरणात्मक निर्णय घेतले आहेत काय,

(३) असल्यास, त्याचा तपशील काय आहे,

(४) सदर तपशील उपलब्ध नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियमाच्या कलम ६३-एक-अ मध्ये खऱ्याखुऱ्या औद्योगिक प्रयोजनासाठी विकास आयुक्त (उद्योग) यांच्या पूर्व परवानगीने १० हे.पेक्षा अधिक शेतजमीन खरेदी करण्याबाबत तरतूद होती. राज्याचे औद्योगिक धोरण व मेक इन महाराष्ट्र या उपक्रमाचा विचारकरता उद्योग सुगमता यावी या उद्देशाने सदर तरतूद सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१ अन्वये सुधारित करण्यात आली आहे. त्यानुसार खऱ्याखुऱ्या औद्योगिक प्रयोजनासाठी शेतजमीन खरेदी करण्यासाठी पूर्व परवानगीची अट रद्द करण्यात आली आहे.

तथापि, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ अन्वये प्रारुप किंवा अंतिम प्रादेशिक योजना किंवा नगररचना परियोजना लागू असलेल्या भागात ज्या ठिकाणी औद्योगिक वापर अनुज्ञेय नाही अशा ठिकाणी कलम ६६-एक-अ खाली खऱ्याखुऱ्या औद्योगिक प्रयोजनासाठी शेतजमीन खरेदी करणे अनुज्ञेय नाही. तसेच खऱ्याखुऱ्या औद्योगिक प्रयोजनासाठी शेतजमीन खरेदी केल्यावर अशा जमीनीचा वापर ५ वर्षाच्या आत करणे अनिवार्य करण्यात आले असून तद्नंतर प्रचलीत वार्षीक बाजारमुल्य दर तक्त्यातील होणाऱ्या एकूण

किंमतीच्या २% इतकी रक्कम दरवर्षी आकारुन आणखी ५ वर्षाची मुदतवाढ देण्याची तरतूद करण्यात आली आहे. सदर कालावधीत औद्योगिक वापर न केल्यास मुळ शेतकऱ्यास जमीन खरेदी किंमतीस परत करण्याचीही तरतुद करण्यात आली आहे. यामुळे औद्योगिक प्रयोजनासाठी खरोखर गरज असल्याशिवाय शेत जमिनीची खरेदी करण्यास पायबंद घालण्यात आला आहे.

-----------------

**हिंगोली जिल्ह्यात शासकीय-निमशासकीय कार्यालये सुरु करण्याबाबत**

**(२०) * १७२१४ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्याच्या निर्मितीस १५ वर्षाचा कालावधी होवून गेला तरीही सिंचन, परिवहन, मुद्रांक इ. आवश्यक २० शासकीय व निमशासकीय कार्यालये नसल्याने येथील नागरिकांना दुस-या जिल्ह्यावर अवलंबून रहावे लागत असून येथे हजारो पदे रिक्त असल्याने नागरिकांची गैरसाय होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून येथील नागरिकांची होणारी गैरसोय दूर करण्याकरिता आवश्यक असलेली शासकीय-निमशासकीय कार्यालये सुरु करून येथील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) परभणी जिल्ह्याचे विभाजन होवून दिनांक ०१ मे, १९९९ रोजी हिंगोली जिल्ह्याची निर्मिती झाली. हिंगोली जिल्ह्यात अद्याप पावेतो कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग राज्यस्तर, विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, सहाय्यक जिल्हानिबंधक मुद्रांक, सहाय्यक आयुक्त अन्न व औषध प्रशासन, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, व्यवस्थापक, दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, जिल्हा व्यवस्थापक म.रा.वखार महामंडळ, कार्यकारी अभियंता, पुर्णा पाटबंधारे प्रकल्प कार्यालय व कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग (स्थानिकस्तर) अशी एकूण ९ राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील शासकीय कार्यालये अद्याप पावेतो स्थापन झालेली नाहीत. राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सदर ९ शासकीय कार्यालये सुरु करण्यास व त्या अनुषंगाने आवश्यक असलेली पदे निर्माण करुन भरण्यास सर्व संबंधित

विभागांना कळविण्यात आले आहे. सद्यस्थितीत सदरहू कार्यालयांचे कामकाज परभणी व हिंगोली जिल्ह्यातील अन्य कार्यालयांमार्फत करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील प्रत्येक घरात वीज पोहोचविण्याबाबत**

**(२१) * १७३३२ श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील प्रत्येक घरात पुढील तीन वर्षांत वीज पोहोचली जाणार असून केंद्र शासनाच्या मदतीने सुमारे रुपये ४५०० कोटी खर्चुन ग्रामीण व शहरी भागातील वीज वितरण प्रणाली सुधारली जाईल अशी घोषणा मा.ऊर्जा मंत्री यांनी केली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर घोषणेनुसार घराघरात वीज पोहोचविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.
केंद्र सरकारने (ग्रामीण भागाकरीता) दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजना व शहरी व निमशहरी भागाकरीता एकात्मिक ऊर्जा विकास योजना (आय.पी.डी.एस.) सुरु केली आहे. केंद्रशासनाच्या देखरेख समितीद्वारे दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती या योजनेंतर्गत रु.२१५२.६८ कोटी व एकात्मिक ऊर्जा विकास योजनेंतर्गत रु.२४०५.०८ कोटीच्या राज्याच्या योजनेच्या प्रस्तावास दिनांक ६.८.२०१५ रोजी तत्वत: मंजुरी दिली आहे.
(२) दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेमध्ये ग्रामीण भागातील ३,९४,१४१ दारिद्ररेषेखालील लाभार्थीसहित १२,४८,४७४ घरगुती ग्राहकांना नवीन वीज जोडणी देणे, ८३७ वाहिन्याचे वाहिनी विलगीकरण करणे, वीज वितरण प्रणाली सक्षमीकरण करणे, सांसद आदर्श ग्रामयोजनेच्या ६९ गावांमध्ये वीज वितरण प्रणालीचे सक्षमीकरण करणे या कामांचा समावेश आहे. महाराष्ट्र राज्यातील ३३ जिल्ह्यांमध्ये २१५ नवीन उपकेंद्रे, १०० उपकेंद्रांची रोहित्र क्षमतावाढ, १०,९२४

वितरण रोहित्रे, १९,४१७ किमी उच्चदाब वाहिनी, ६८१८.४ किमी लघुदाब वाहिनी उभारण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आलेले आहे.

एकात्मिक ऊर्जा विकास योजनेमध्ये शहरी भागात ३,४९८ किलोव्हॅट क्षमतेचे सौर प्रकल्प उभारणे, ६,२१,४७३ नवीन मिटर बसविणे या कामांचा समावेश आहे. राज्यातील २५४ शहरामध्ये वीज वितरण प्रणाली सक्षमीकरण करण्यासाठी १२८ नवीन उपकेंद्र, ८९ उपकेंद्राची रोहित्र क्षमतावाढ, ५७०५ वितरण रोहित्रे, ४५३२.०२ किमी उच्चदाब वाहिनी, ३२३९.९५ किमी लघुदाब वाहिनी उभारण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आलेले आहे.

राज्यातील विद्युतीकरणासाठी दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजना व एकात्मिक ऊर्जा विकास योजना यांची तातडीने अंमलबजावणी करण्यासाठी राज्यशासनाच्या राज्यस्तरीय स्थायी समितींच्या (SLSC) व वितरण सुधारणा समितीच्या (DRC) शिफारशी नंतर दोन्ही योजनांचे प्रकल्प अहवाल केंद्र शासनाकडून तत्वत: मंजूर करून घेतले आहेत. तसेच महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाची दोन्ही योजनेस तत्वत: मंजुरी प्राप्त करण्यात आलेली आहे. तसेच प्रमाणित निविदा दस्तऐवजास केंद्र शासनाची मंजुरी व निविदा प्रक्रिया सुरु करण्याबाबत केंद्र शासनाचे आदेश लवकरच अपेक्षित आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत योजनेसाठी अनुदान उपलब्ध करून देणेबाबत**

**(२२) * १७३९५ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामीण बेरोजगार युवकांना स्वयंरोजगार उपलब्ध करुन देण्यासाठी ४० अधिक २ शेळयांचे गट ५० टक्के अनुदानावर वाटप केले जातात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राष्ट्रीय कृषी विकास योजनेंतर्गत राबविण्यात येणाऱ्या या योजनेसाठी शासनाने ५० टक्के अनुदानाची रक्कमच न दिल्याने ही योजना प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ११ महिने होऊनही व सर्व बाबींची पुर्तता करुनही लाभार्थ्यांना या योजनेपासून वंचित रहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, सदर योजनेला अनुदान देऊन बेरोजगारांना शेळयांचे गट वाटप करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे आहे.
(२), (३), (४) व (५) हे खरे नाही.

सन २०१५-१६ या वर्षामध्ये रुपये ७.०० कोटी एवढा निधी आयुक्त पशुसंवर्धन यांच्याकडे वितरणासाठी सुपुर्द करण्यात आला आहे. सदर निधीतून पात्र असलेल्या ४६२ लाभार्थींना जेष्ठतेनुसार अनुदान उपलब्ध करून देण्याची कार्यवाही आयुक्त पशुसंवर्धन यांचे स्तरावर सुरु आहे.

-----------------

**माथेरान (जि.रायगड) या पर्यटनस्थळी ई-रिक्षा, सीएनजी किंवा बॅटरीवर चालणाऱ्या रिक्षांना परवानगी मिळणेबाबत**

**(२३) * १८०९५ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महसूल विभागाच्या अधिसूचनेन्वये केलेल्या नियमावलीनुसार माथेरान (जि.रायगड) या पर्यटनस्थळाचे निसर्गसौंदर्य अबाधित राहण्यासाठी कोणत्याही प्रकारचे वाहन वापरण्यास बंदी असून फक्त घोडा व हातरिक्षा यांचा वापर वाहतुकीसाठी केला जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या नियमावलीमुळे स्थानिक वृध्द नागरिकांना व विद्यार्थ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने पर्यावरण पूरक व्यवस्थेसाठी नियमावली बदल करुन ई-रिक्षा, सीएनजी किंवा बॅटरीवर चालणाऱ्या रिक्षांना परवानगी मिळावी अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या मागणीनुसार जिल्हाधिकारी, रायगड यांनी आपला प्रस्ताव शासनास सादर केला असून विभागीय आयुक्तांचा प्रस्ताव प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) शासन निर्णय दि.८/९/१९५९ नुसार माथेरान या पर्यटन स्थळासाठी नियमावली तयार करण्यात आलेली असून त्यानुसार माथेरान येथे मोटारगाडी, सायकल, तीनचाकी सायकल, इत्यादी वापरण्यास निर्बंध आहेत. त्यामुळे घोडा व हातरिक्षा हेच अंतर्गत वाहतुकीसाठी वापरण्यात येतात. अध्यक्ष, श्रमिक रिक्षा चालक मालक सेवा संस्था, माथेरान यांनी दि.२/३/२०१५ रोजी जिल्हाधिकारी, रायगड यांचेकडे निवेदन देऊन माथेरान येथे ई रिक्षा, सी.एन.जी. रिक्षा तथा बॅटरीवर चालणारी रिक्षा चालविण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केलेली आहे.

(३) व (४) सदर मागणीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, रायगड यांनी शासनाकडे प्रस्ताव सदर केलेला आहे. शासनाच्या दि.२५/१/२०१६ रोजीच्या पत्रान्वये विभागीय आयुक्त, कोकण यांना जिल्हाधिकारी, रायगड यांनी सादर केलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शिफारस वजा अभिप्राय शासनास सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले आहे. विभागीय आयुक्तांचा अहवाल प्राप्त झाल्यावर या कामी उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मनमाड-मालेगांव-धुळे-नरडाणा-इंदौर रेल्वे मार्गासाठी मंजुर निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२४) * १८३१२ डॉ.अपूर्व हिरे, श्री.चंद्रकांत रघुवंशी, डॉ.सुधीर तांबे, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनमाड-मालेगांव-धुळे-नरडाणा-इंदौर या प्रस्तावित रेल्वे मार्गाकरिता आवश्यक असलेला राज्य शासनाच्या हिश्याचा रूपये ४१२ कोटी निधी शासनाने मंजुर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धुळे-नाशिक जिल्ह्याच्या औद्योगिक विकासासाठी रोजगार निर्मितीला चालना देणारा आणि आर्थिक लाभाच्यादृष्टीने रेल्वेला अत्यंत किफायतशीर ठरणारा हा प्रकल्प सत्वर व्हावा, या मागणीसाठी गेली २० वर्षे आंदोलन करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मनमाड-इंदौर रेल्वे मार्गाचे काम सुरु करावे, या मागणीसाठी धुळे येथे दिनांक २१ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास लाक्षणिक उपोषण करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, खानदेशाच्या विकासाचेदृष्टीने अत्यंत महत्वपुर्ण असलेल्या उक्त प्रस्तावित रेल्वे प्रकल्पासाठी आवश्यक असणाऱ्या निधीपैकी राज्य शासनाच्या हिश्याची मंजुर रक्कम केंद्रीय रेल्वे मंत्रालयास उपलब्ध करून देणेबाबत राज्य शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,

(५) असल्यास, याबाबत शासनाचे धोरण काय आहे व त्यासाठी राज्याच्या हिश्याचा मंजुर निधी उपलब्ध करून देणे व रेल्वे मार्गास मंजुरी मिळून प्रत्यक्ष काम सुरु होणेबाबत राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे कोणती आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) नाही.

(२) होय.

(३) नाही.

(४) व (५) रेल्वे अर्थसंकल्प २०१६-१७ मध्ये सदर प्रकल्पास मंजूरी देण्यात आली आहे. हा प्रकल्प रेल्वे मंत्रालयासोबत जे.व्ही.कंपनीद्वारे अंमलात आणण्यास शासनाने सहमती दर्शविली आहे. जे.व्ही.कंपनीची नोंदणी प्रक्रिया प्रगती पथावर आहे.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**माण (जि.सातारा) तालुक्यात शेतकऱ्यांना वीज पुरवठा करण्याबाबत**

**(२५) * १८७९९ श्री.आनंदराव पाटील, श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माण (जि.सातारा) तालुक्यात शेतकऱ्यांच्या पिकांना पाणी उपलब्ध असतानाही केवळ विजेअभावी पाणी न दिल्याने पिके करपून गेली असून वीज वितरण कंपनीकडून वीज पुरवठा न मिळाल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोष पसरला असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीजवितरण कंपनीकडून वीज पुरवठा करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे अंशत: खरे आहे.

माण तालुक्यामध्ये मार्च, २०१५ अखेर शेतीपंपाचे ६४७ ग्राहक पैसे भरुन प्रलंबित होते. त्यापैकी माहे एप्रिल, २०१५ ते फेब्रुवारी, २०१६ या कालावधीत ३९९ शेतीपंप वीज जोडण्या देण्यात आल्या आहेत व उर्वरित कामे प्रगतीपथावर आहेत.

(२) माण तालुक्यामध्ये मार्च, २०१५ अखेर पैसे भरुन प्रलंबित कृषी ग्राहक व वर्ष २०१५-१६ या वर्षात पैसे भरुन प्रलंबित असलेले कृषी ग्राहक या सर्व ग्राहकांना वीज पुरवठा करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राजापूर (जि.रत्नागिरी) शहरातील रहिवाश्यांना जमिनीचा मालकी हक्क देण्याबाबत

**(२६) * १८८०२ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजापूर (जि.रत्नागिरी) शहरात शंभर वर्षापासून शासकीय गावठाण जागेवर पक्की घरे बांधून राहत असलेल्या रहिवाश्यांना या जागेचा कायमस्वरुपी मालकी हक्क मिळावा यासाठी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीवर शासनाने निर्णय घेऊन येथील रहिवाश्यांना घराखालील जमिनीचा मालकी हक्क देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अशा स्वरुपाचे निवेदन महसूल विभागाकडे प्राप्त झाल्याचे आढळून आले नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## उद्‌गीर (जि.लातूर) तालुक्यातील फळबागा शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(२७) * १८९२४ श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उद्‌गीर (जि.लातूर) तालुक्यात पाण्याअभावी फळबागा होरपळल्यामुळे शासनाने फळबागा नुकसानीबाबत जाहिर केलेली मदत माहे जानेवारी, २०१६ अखेर मिळाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार उद्‌गीर तालुक्यात होरपळून गेलेल्या बागधारक शेतकऱ्यांना मदत देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) उद्‌गीर (जि.लातूर) तालुक्यातील कोरडवाहू पिकांच्या नुकसानीसाठी बाधित शेतकऱ्यांना मदत वाटप करण्यासाठी रुपये २९.५९ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला असून त्यापैकी रुपये २९.४१ कोटी इतका निधी वाटप करण्यात आला आहे. उर्वरित आपदग्रस्त शेतकऱ्यांच्या बँक खात्यात अनुदान जमा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

बागायती व फळपिकांच्या नुकसानीचे पंचनामे करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई जिल्हाधिकारी कार्यालयात कंत्राटी तत्वावर निवडणूक विषयक विभागात तसेच महाराष्ट्र लॉटरी विभागातील कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याबाबत

**(२८) * १८९३३ आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई जिल्हाधिकारी कार्यालयात कंत्राटी तत्वावर निवडणूक विषयक विभागात तसेच महाराष्ट्र लॉटरी विभागात वर्षानुवर्षे नियमित काम करणाऱ्या १३ कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करण्याचा महत्वपूर्ण निकाल महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरणाने (मॅट) दिला असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मॅटने दिलेल्या निकालानुसार सदर कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) मुंबई जिल्हाधिकारी कार्यालयात निवडणूक शाखेत गट "क" मधील १६ व गट "ड" मधील १० अशा एकूण २६ कंत्राटी तत्त्वावर नियुक्त हंगामी कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करण्यासंदर्भात ३ महिन्यांत विचार करणेबाबतचा आदेश मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने दिनांक ८.१०.२०१५ रोजी दिलेला आहे. त्यानुषंगाने विधी व न्याय विभाग, सामान्य प्रशासन विभाग व वित्त विभाग यांच्याशी विचारविनिमय करुन यासंदर्भात उचित निर्णय घेण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

महाराष्ट्र लॉटरी विभागात नियमित काम करणारे १८ करार पध्दतीवरील कर्मचारी ज्यांची सेवा तांत्रिक खंडासह ३ वर्षे झालेली आहे त्यांना ६ आठवड्यात नियमित शासन सेवेत सामावून घ्यावे आणि त्यांना वेतनविषयक लाभ दिनांक १.०३.२०१६ पासून देण्यात यावे. मागील सेवेचे आर्थिक लाभ अनुज्ञेय असणार नाहीत, इतर सर्व बाबींसाठी त्यांच्या नियुक्तीपासूनची सेवा ग्राह्य धरण्यात यावी, असा निर्णय मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने दिनांक २२.०१.२०१६ अन्वये वित्त विभागास दिलेला आहे. या संदर्भात विधी व न्याय विभागाने या निर्णयाविरुध्द उच्च न्यायालयात अपिल दाखल करण्यास सहमती दिल्याने मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे अपिल दाखल करण्याची कार्यवाही वित्त विभागामार्फत सुरु आहे.

-----------------

**शासकीय भूखंड वाटपासाठी नविन धोरण राबविण्याबाबत**

**(२९) * १८९६५ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाने शासकीय भूखंड वाटपाचे जुने धोरण रद्द करुन नवीन धोरणानुसार भुखंड वाटपाचे धोरण स्वीकारण्याचा निर्णय माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेतल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नविन धोरणाचे स्वरुप काय आहे,

(३) तसेच सदर धोरणाची अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ व महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट करणे), नियम १९७१ मध्ये विविध प्रयोजनार्थ शासकीय जमीन प्रदानाच्या तरतुदी आहेत. या तरतुदी अन्वये शासकीय जमीन सवलतीच्या दराने प्रदान करण्याबाबत वेळोवेळी शासन निर्णय निर्गमित करुन धोरण निश्चित करण्यात आले आहे. शासकीय जमीन सवलतीच्या दराने प्रदान करण्याबाबतचे प्रचलित धोरण सुधारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

-----------------

**मौजे शिरसाळे (ता.अमळनेर, जि.जळगाव) येथील मेंढपाळ यांना नुकसान भरपाई देण्याबाबत**

**(३०) * १९१२२ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे शिरसाळे (ता.अमळनेर, जि.जळगाव) येथील झाडी शिवारात सुमारे ७५ मेंढ्यांनी ज्वारीचे फुटवे खाल्याने विषबाधा होऊन जागीच मृत झाल्या व गरीब मेंढपाळ यांचे सुमारे १० लाख रुपयांचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, तद्नुसार नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे आहे.
(२) दिनांक ६.२.२०१६ रोजी मौजे शिरसाळे, ता.अमळनेर, जि.जळगाव येथे ६ मेंढपाळांकडील ४८० शेळ्या मेंढ्यापैकी ७३ मेंढ्या व २ शेळ्या ज्वारीचे कोवळे फुटवे खाल्याने हायड्रोसायनीक ॲसीडच्या विषबाधेमुळे अचानक मृत झाल्याचे आढळून आले आहे. तसेच बाधीत शेळ्या मेंढ्यावर पशुवैद्यकीय पथकामार्फत तात्काळ उपचार केला.

(३) नुकसानग्रस्त मेंढपाळांनी तहसीलदार, अमळनेर यांचेकडे दिनांक ६.२.२०१६ रोजी मृत मेंढ्या शेळ्यांची नुकसान भरपाई मागणी अर्ज सादर केलेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**माळीण (ता.आंबेगाव, जि.पुणे) येथील गावाचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(३१) * १९२१३ अॅड.जयदेव गायकवाड, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर : तारांकित प्रश्न क्रमांक ११२३५ ला दिनांक ११ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माळीण (ता.आंबेगाव, जि.पुणे) येथील गावच्या दुर्घटनेला सुमारे दीड वर्षाचा कालावधी होऊन सदर गावाचे पुनर्वसन आणि घोषित केलेली मदत देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार पुण्यातील माळीण गावाचे पुनर्वसन तसेच घोषित केलेली मदत देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**नाशिक जिल्ह्यामध्ये अति उच्चदाब उपकेंद्रांची स्थापना करण्याबाबत**

**(३२) * १६४५९ श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यामध्ये ४ ठिकाणी मंजूर असलेल्या १३२/३३ के.व्ही. अति उच्चदाब उपकेंद्रांची स्थापना करण्याचे प्रलंबित असल्यामुळे सदर अति उच्चदाब उपकेंद्र निर्माण करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे व महापारेषण कार्यालयाकडे मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, तद्नुसार उक्त प्रलंबित अति उच्चदाब उपकेंद्राची स्थापना करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय.
(२) व (३) मागणी करण्यात आलेल्या अंदरसूल, पाटोदा, विंचूर व नांदगाव या चार १३२/३३ के.व्ही. उपकेंद्रापैकी अंदरसूल व नांदगाव उपकेंद्राची सध्या आवश्यकता नसल्याचे महावितरण कंपनीने महापारेषण कंपनीस कळविले आहे.

विंचूर उपकेंद्राबाबतचा प्रस्ताव महावितरण कंपनीकडून अद्यापि अप्राप्त आहे. तथापि, भविष्यात या उपकेंद्राच्या आवश्यकतेबाबत महावितरण कंपनीकडून महापारेषण कंपनीस प्रस्ताव प्राप्त झाल्यास तांत्रिक अभ्यासाद्वारे सुसाध्यता (Feasibility) तपासून महापारेषण कंपनीकडून उचित निर्णय घेण्यात येईल.

पाटोदा उपकेंद्राऐवजी ३३ के.व्ही. वाहिन्यांची पुनर्रचना करण्याबाबत महापारेषण कंपनीकडून महावितरण कंपनीस कळविण्यात आले आहे. तसेच सदरहु उपकेंद्राच्या सुसाध्यतेबाबत महापारेषण कंपनीमार्फत पडताळणी सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी शहर व जिल्ह्यात वीज ग्राहकांकडून चुकीच्या पध्दतीने वीज देयकाची रक्कम वसूल होत असल्याबाबत

**(३३) * १५०४७ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी शहर व जिल्हयातील वीज ग्राहकांकडून चुकीच्या पध्दतीने व वीज कायदा २००३ च्या निकषांना डावलून वीज देयकाची रक्कम वसुली होत असल्याचा आक्षेप परभणी-हिंगोली जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी यांनी प्रधान सचिव, ऊर्जा विभाग, मुंबई यांच्याकडे माहे ऑक्टोबर २०१५ मध्ये वा त्या दरम्यान लेखी निवेदनाव्दारे नोंदविला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज बील वसुली करणाऱ्या उपविभागीय अधिकारी, कनिष्ठ अभियंता व इतर कर्मचारी यांच्या मनमानी कारभारावर नियंत्रण आणुन ग्राहक हिताचे संरक्षण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) वीज अधिनियम, २००३ मधील प्रचलीत नियमानुसार महावितरणच्या परभणी मंडळ कार्यालयातर्फे थकबाकीदार वीज ग्राहकांकडून थकीत वीज बिलाची रक्कम वसूल करण्याकरिता परभणी विभागांतर्गत संबंधित उपविभागीय अधिकारी यांना वेळोवेळी सूचित करण्यात आले आहे. परभणी कार्यालयातर्फे कायद्याचा अनादर व ग्राहक हिताचा अवमान होत नसून ग्राहक हिताचे संरक्षण करुन वसुली करण्यास्तव महावितरणतर्फे मध्यवर्ती ग्राहक सेवा केंद्र भांडूप व पुणे येथे स्थापन करून त्यामार्फत फ्युज ऑफ कॉल, बिलींग तक्रारी, नवीन विद्युत कनेक्शन व इतर सेवा ऑनलाईन पुरविण्यात येत आहे. महावितरणच्या परभणी कार्यालयामध्ये ग्राहक निवारण कक्ष वीज ग्राहकांच्या तक्रारी सोडविण्याकरिता स्थापन करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे आहेरचिंचोली (ता.जि.बीड) येथील श्रीराम मंदिर देवस्थान जमिनीवर अतिक्रमण केल्याबाबत

**(३४) * १७४५१ श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आहेरचिंचोली, (ता.जि.बीड) येथे गट नं.१ व १६ मध्ये सुमारे ७ हेक्टर देवस्थान मालकीची आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वहितीदाराने बनावट दस्तऐवज तयार करुन मागील अनेक वर्षापासून या जमिनीवर वहिती अंमल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करुन दोषींविरुध्द कारवाई करण्याची मागणी विविध सामाजिक संघटना व इतरांनी माहे जानेवारी २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली असून याबाबत आंदोलने होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मौजे आहेरचिंचोली प्रकरणात बनावट दस्ताऐवज तयार करुन देवस्थान जमिनीचा कब्जा केल्याप्रकरणी दोषीविरुध्द कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) श्रीराम मंदिर, बीड या देवस्थानाच्या मालकी हक्काची जमीन मौजे आहेर चिंचोली, ता.जि.बीड येथे ग.नं.१ मध्ये नसुन ग.नं.१६ मध्ये ३ हे. ५७ आर एवढी आहे.

(२), (३) व (४) श्रीराम मंदिराची जमीन खोटे दस्तऐवज तयार करून बळकावली अशा आशयाची तक्रार विविध संघटनांनी केली आहे. सदर तक्रारींच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी, बीड यांचेमार्फत चौकशीची कार्यवाही सुरु आहे. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्याचे योजिले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राजुरा (जि.चंद्रपूर) शहरातील जमिनीवर विनापरवानगीने घरे बांधल्याबाबत

**(३५) * १७७१६ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजुरा (जि.चंद्रपूर) शहरातील सर्व्हे क्र.१४९/२ मधील वाटपात मिळालेल्या शेतजमीनीची यंत्राव्दारे मोजणी करण्यात येत असल्याचे दिनांक १५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाटपात मिळालेल्या जमिनीवर अनकोंनी स्लॅबची पक्के घरे नगरपरिषदेच्या परवानगी शिवाय बांधली गेली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, तदनुसार शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) मौजे राजूरा, जिल्हा चंद्रपूर येथील स.नं. १४९/२ (क्षेत्र ६.५२ हे.आर.) हा स.नं. १४९ या भूखंडाचा एक भाग असून सदर भूखंडाची मोजणी उप अधीक्षक भूमी अभिलेख, राजूरा यांच्यामार्फत सुरु आहे.

(२), (३), (४) व (५) स.नं. १४९/२ मधील “गायरान” म्हणून दर्शविलेल्या ४.९० हे.आर. क्षेत्राव्यतिरिक्त १.६२ हे.आर. क्षेत्रावर विनापरवाना पक्के बांधकाम झालेले आहे. अवैध बांधकामावर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ मधील कलम ५३ (१) अंतर्गत नोटीस बजावण्यात आली आहे.

-----------------

**नांदेड येथे विभागीय आयुक्त कार्यालय स्थापन करण्याबाबत**

**(३६) * १९१३५ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड येथे विभागीय आयुक्त कार्यालय स्थापन करण्यासाठी नांदेड हे भौगोलिकदृष्ट्या जिल्हयांच्या मध्यभागी येत असून शासनाच्या अकार्यक्षमतेमुळे विभागीय आयुक्त कार्यालयाची घोषणा करण्यात येत नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नांदेड विभागीय आयुक्त कार्यालयासाठी दांगट समिती नेमूनही केवळ राजकीय दबावापोटी त्या समितीचा अहवाल सादर केला जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तदनुसार नांदेड विभागीय आयुक्त कार्यालय स्थापन करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) औरंगाबाद महसूल विभागीय आयुक्तालयाचे विभाजन करून नांदेड येथे नवीन महसूल विभाग सुरु करण्याबाबत दिनांक २.१.२०१५ च्या शासन राजपत्रात प्रारूप अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली होती. सदर प्रारूप अधिसूचनेवर हरकती व सूचना मागविण्यात आल्या होत्या. त्यानुषंगाने मोठ्या प्रमाणात हरकती व सूचना विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाल्या. सदर हरकती व सूचना यांची व्याप्ती विचारात घेता विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबादचे विभाजन करून नव्याने निर्माण करावयाच्या विभागीय आयुक्तालयात कोणत्या जिल्हयांचा समावेश करावा व नवीन विभागीय आयुक्तालयाचे मुख्यालय कोणत्या ठिकाणी असावे, या विषयी सखोल अभ्यास करून तत्संबंधी शासनास शिफारशी करण्यासाठी विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली एक सदस्यीय

अभ्यासगट स्थापन करण्यात आला होता. त्यानुसार सदर अभ्यासगटाने आपला अहवाल शासनास सादर केला असून सदर अहवालावर उचित निर्णय घेण्याची बाब शासनस्तरावर तपासण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे देवणी बु. (जि.लातूर) येथील बेघर व विस्थापित महिला कुटुंब प्रमुखांच्या घरासाठी जागा मिळणेबाबत**

**(३७) * १७३११ श्री.सुभाष झांबड, श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे देवणी बु.जमीन सर्वे नंबर २२६/२३८/१ मधील ०२ हेक्टर जमीन गावठाण विस्तारासाठी राखीव असलेली ७५ लोकांची मागणीची अर्जासह यादी श्रमिक हक्क अभियान, महाराष्ट्र संलग्न नॅशनल दलित मानवी हक्क अभियान या संघटनेने श्रीमती ए.एन.गाठाळ, तहसीलदार (लातूर) यांच्याकडे दाखल केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बेघर व विस्थापित महिला कुटुंब प्रमुखांच्या नावे घरासाठी जागा मिळणे संदर्भात समर्थन या संस्थेने मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री (महसूल), मा.मंत्री (ग्रामविकास) तसेच सचिव (महसूल) यांच्याकडे दिनांक १८ जुलै, २०१५ तसेच दिनांक १४ सप्टेंबर, २०१५ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(४) असल्यास, तद्नुसार गरीब गरजू बेघर व विस्थापित महिला कुटुंब प्रमुखांच्या नावे घरासाठी जागा मिळण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.
(२) समर्थन या संस्थेचे मा.मुख्यमंत्री यांना सादर केलेले दिनांक १४.९.२०१५ चे निवेदन प्राप्त झाले आहे.

(३) व (४) श्रमीक हक्क अभियान महाराष्ट्र संलग्न नॅशनल दलित मानवी हक्क अभियान, भारत या संघटनेच्या निवेदनासोबत संलग्न असलेल्या ७५ बेघर व विस्थापित महिला कुटूंब प्रमुखांची तपासणी अन्य प्राप्त अर्जासह तहसिलदार, देवणी, जि.लातूर यांनी स्थापित केलेल्या विशेष पथकामार्फत करण्यात येत असून पात्र लाभार्थ्यांची यादी तयार करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मालेगाव (जि.नाशिक) तालुक्यात तहसील कार्यालयातील लाचखोर तलाठ्यावर कारवाई करण्याबाबत**

**(३८) * १६५४३ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.नाशिक) तालुक्यात तहसील अंतर्गत श्री.वसंत भीमराव चव्हाण या तलाठ्याने पीक कर्जाचा बोजा रद्द करण्यासाठी लाच घेतल्या प्रकरणी अटक करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले, तद्‌नुसार लाचखोर तलाठ्याविरुद्ध महसुल विभागाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) श्री.वसंत भिमराव चव्हाण, तलाठी अजंग, ता.मालेगांव, जि.नाशिक यांनी तक्रारदार श्री.पंढरीनाथ कर्डीवाल यांच्याकडून गाव नमुना नंबर ७/१२ उताऱ्यावरील कर्जाचा बोजा कमी करण्यासाठी लाच स्वीकारल्याच्या आरोपावरून त्यांच्याविरुध्द लाचलुचपत प्रतिबंध अधिनियम, १९८८ च्या कलम ७, १३(१) (ड) सह १३(२) अनुसार मालेगांव कॅम्प पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्यासाठी त्यांना अटक करण्यात येऊन १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी मंजूर करण्यात आली. त्यामुळे श्री.चव्हाण यांना उपविभागीय अधिकारी, मालेगांव, जि.नाशिक यांनी दिनांक १.३.२०१६ च्या आदेशान्वये निलंबित केले असून त्यांच्याविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## खामगांव विभागांतर्गत महवितरणच्या ३३ नवीन के.व्ही.उपकेंद्रासाठी आवश्यक असलेल्या तांत्रिक पदांना मंजूरी मिळण्याबाबत

**(३९) * १६५८२ श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरणच्या मंडळ कार्यालयांतर्गत खामगांव विभागातंर्गत नवीन ३३ के.व्ही. उपकेंद्र मंजूर झालेले असून त्यांचे काम सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या उपकेंद्रासाठी उपयंत्र चालक/ सहाय्यक यंत्रचालक/ कनिष्ठ यंत्रचालक/ कनिष्ठ तंत्रज्ञानाची पदे मंजूर नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरची पदे मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव अधीक्षक अभियंता, सं.व सु.मंडळ, बुलढाणा यांनी दिनांक ३१ जानेवारी, २०१४ रोजी शासनाकडे पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरचा प्रस्ताव मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) असा प्रस्ताव अधीक्षक अभियंता, बुलढाणा यांनी शासनाकडे पाठविलेला नाही. कार्यान्वीत उपकेंद्राच्या आस्थापनेवर उपकेंद्र कार्यान्वीत झाल्याच्या दिनांकापासून पद मंजुरीबाबतचे निर्देश क्षेत्रीय कार्यालयांना महावितरण कंपनीकडून देण्यात आलेले आहेत. खामगांव विभागांतर्गत ३३ केव्हीची ५ उपकेंद्रे मंजूर करण्यात आली आहेत. त्यापैकी कळंबेश्वर या उपकेंद्राकरिता १ उपयंत्र चालक, ३ कनिष्ठ यंत्रचालक मंजूर करण्यात आले आहेत. उर्वरित ४ उपकेंद्रांची कामे सुरू असून, ती कार्यान्वित होताच तेथील पदांना मंजुरी देण्याबाबत महावितरण कंपनीकडून कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील एसटी चे होणारे अपघात टाळण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत**

**(४०) * १६७४६ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.शरद रणपिसे, श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जुनाट बसेस, तांत्रिक बिघाड व अपुरे मुनष्यबळ इ. कारणामुळे एस.टी. बसेसच्या अपघातामध्ये गत पाच वर्षामध्ये २ हजार ५५३ प्रवाश्यांचा बळी गेल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निदर्शनास आले,

(३) असल्यास, तद्नुसार रस्ते अपघात नियंत्रणात आणण्यासोबतच महामंडळाच्या बस सेवेत अत्याधुनिक बसेसचा समावेश करून प्रवासी व एसटी कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे अंशत: खरे आहे.

गत ५ वर्षात विविध कारणांमुळे प्रवाशी, पादचारी, राज्य परिवहन कर्मचारी व इतर असे एकूण २५८९ जण एसटी अपघातात मृत झालेले आहेत.

तथापि, जुनाट बसेस व अपुरे मनुष्यबळ इ.कारणांमुळे प्रवाशांचा मृत्यू झालेला नसून रा.प.चालकांच्या चुकीमुळे तसेच अन्य वाहन चालकांच्या चुकीमुळे प्रामुख्याने अपघातात प्रवाशांचा मृत्यू झालेला आहे.

(२) होय.

अपघातामध्ये जबाबदार असणाऱ्या रा.प.चालकांवर खात्यांतर्गत कारवाई करण्यात येते. तसेच जबाबदार चालकांवर गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत.

(३) रा.प.महामंडळाच्या सेवेत अत्याधुनिक व्होल्वो, स्कॅनिया बसेस, आरामदायी आसनव्यवस्था असलेली (पुश बॅक) निमआराम बसेस (हिरकणी) इ. दाखल करण्यात आलेल्या आहेत. तसेच, ५०० वातानुकूलित आसनी व शयनयान बसेस “शिवशाही” बससेवे अंतर्गत चालनात आणण्याची बाब राज्य परिवहन महामंडळाच्या कार्यवाहीखाली आहे.

अपघात नियंत्रणाकरीता खालील उपाय योजना राज्य परिवहन महामंडळाच्या स्तरावर करण्यात आल्या आहेत.

दिनांक १५.४.२०१५ पासून रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे येथे अपघात प्रवण चालकांना ७ दिवसाचे निवासी प्रशिक्षण देण्यात येते.

मे.वेस्टर्न इंडिया ऑटोमोबाईल्स असोसिएशन तर्फे दिनांक १.२.२०१४ पासून एक दिवसाचे सिम्युलेटर प्रशिक्षण देण्यात येते.

चालकांसाठी प्रत्येक विभागामध्ये चालकांच्या सकारात्मक मानसिकतेकरिता तज्ञ समुपदेशकाची नियुक्ती करण्यात येऊन त्याचेद्वारे समुपदेशन केले जात आहे.

प्रजापिता ब्रम्हाकुमारी विश्वविद्यालयाच्या प्रशिक्षणामार्फत प्रशिक्षण शिबिरे आगार पातळीवर आयोजित करून चालकांना त्यांचेकडून मार्गदर्शन करून प्रबोधन केले जाते.

तसेच दिनांक १.१०.२०१५ पासून उत्पादित होणाऱ्या प्रत्येक चासीसवर ॲन्टी ब्रेक सिस्टिम व स्पिड लिमिटींग डिव्हाईस बसविणे बंधनकारक आहे व त्याप्रमाणे नविन गाड्या महामंडळाच्या ताफ्यात येत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य शासनामार्फत देण्यात येणारे कृषी पुरस्कार शेतकऱ्यांना देण्याबाबत

**(४१) * १६७९८ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनामार्फत शेतकऱ्यांना देण्यात येणारा कृषी पुरस्कार गेल्या वर्षभरापासून शेतकऱ्यांना देण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,

(३) सदर कृषी पुरस्कार देण्यासंदर्भातील सद्य:स्थिती काय आहे व हे पुरस्कार केव्हा देण्यात येणार आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) कृषी पुरस्कार सन २०१४ बाबत प्राप्त झालेल्या प्रस्तावांमधून निकषाप्रमाणे पात्र प्रस्तावांची छाननी करण्यात आलेली आहे. प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रेल्वे प्रवासात प्रवाशांचे होणारे अपघात रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत**

**(४२) * १६८१५ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उपनगरीय लोकल मार्गावरुन सन २००२ पासून ते माहे जानेवारी, २०१६ पर्यंत ५० हजार प्रवाशांचा अपघाती मृत्यू झाल्याची माहिती माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रेल्वे प्रवासात प्रवाशांचे होणारे मृत्यू रोखण्यासाठी व रेल्वे प्रशासनाकडून आवश्यक ती प्रवाशांच्या सुरक्षतेबाबत दक्षता केंद्र शासनाकडून घेण्याबाबत शासनस्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**(उत्तर आले नाही.)**

---------------

**राज्यात वीज मनोरा उभारण्यासाठी अधिग्रहण करण्यात आलेल्या जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना देण्याबाबत**

**(४३) * १७४०४ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अमरसिंह पंडित : तारांकित प्रश्न क्रमांक ७४४८ ला दिनांक १६ जुलै, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात चंद्रपूर ते औरंगाबाद व भोपाळ ते धुळेपर्यंत १२००, ७६५ व ४०० केव्हीच्या विद्युत लाईन्स टाकण्याचे काम सुरु आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर लाइन्स राज्यातील १४ जिल्हयातुन जात असल्यामुळे २ लाख शेतकरी प्रभावित होणार आहेत, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, विद्युत टॉवर्सच्या लाईन्समुळे प्रभावित होणाऱ्या शेतकऱ्यांना शासनाच्यावतीने अत्यल्प मोबदला दिला जात आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, याबाबत नविन शासन निर्णयानुसार शेतकऱ्यांना वाढीव मोबदला देण्याचे ठरविण्यात आल्यानंतरही अनेक जिल्हाधिकाऱ्यांकडून शेतकऱ्यांचे याबाबतचे मागणी अर्ज स्वीकारले जात नाहीत, हे ही खरे आहे काय

(५) असल्यास, विद्युत टॉवर्सच्या लाईनमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना वाढीव मोबदला देणेबाबत शासनाची शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) चंद्रपूर ते औरंगाबाद व भोपाळ ते धुळे या दरम्यान महापारेषण कंपनीकडून कोणत्याही वाहिनीचे काम सुरु नाही. मात्र यापैकी काही ठिकाणी खाजगी कंपन्याकडून विद्युत लाईन टाकण्याचे काम सुरु आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही,

बाधीत शेतकऱ्यांना /जमिनधारकांना मनोऱ्याने व्याप्त जमिनीचा मोबदला शासन निर्णय ऊर्जा विभाग दि. ०१.११.२०१० अनुसार देण्यात येतो. तसेच पिकांच्या / फळझाडांच्या नुकसानीची भरपाई शासनाच्या संबंधित विभागाकडून मूल्यांकन करुन घेऊन देण्यात येते.
(४) हे खरे नाही.

बाधित शेतकऱ्यांना वाढीव मोबदला देण्याबाबतचा शासन निर्णय अद्याप निर्गमित झालेला नाही.
(५) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार मनोऱ्याने व्याप्त जमिनीच्या मोबदल्यात वाढ करणेबाबत तसेच वाहिनीच्या पट्टयाखालील जमिनीचा मोबदला देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांना परिवहन खात्याच्या नोकरभरतीत प्राधान्य देणेबाबत**

**(४४) * १८३१३ डॉ.अपूर्व हिरे : दिनांक १५ डिसेंबर, २०१५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक ४ मधील प्रश्न क्रमांक ८३८३ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांना परिवहन खात्यातील नोकर भरतीत प्राधान्य देण्यासंबंधीच्या विचाराधिन असलेल्या प्रस्तावावर शासनाचा विचार पुर्ण झाला आहे काय,
(२) असल्यास, राज्यात सन २०१५ मध्ये एकूण ३२२८ आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे पाल्यांना परिवहन खात्यातील सेवेत सामावून घेण्याचेदृष्टीने निर्णय घेण्यात आला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२), (३) व (४) राज्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यांना नोकरभरतीत प्राधान्य देता येईल किंवा कसे, याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून त्यावर अद्याप अंतिम निर्णय झालेला नाही.

-----------------

**सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यातील नुकसानग्रस्त**
**फळबाग शेतकऱ्यांना मदत करण्याबाबत**

**(४५) * १८९३२ श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ११८५४ ला दिनांक १८ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यात गत वर्षी दुष्काळी परिस्थितीत फळबागा वाचविण्यासाठी शासनाने शेतकऱ्यांना फळबाग पुनरुज्जीवन योजनेतून मदत घोषित केली तथापि आठ महिन्याचा कालावधी उलटून मदत देण्यात आली नाही, मात्र कृषी विभागाने जिल्हाधिकाऱ्यांना मदत वाटप केल्याची माहिती दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सिल्लोड तालुक्यातील शेतकऱ्यांना फळबाग पुनरुज्जीवन योजनेतून घोषित केलेली मदत देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

सिल्लोड (जि.औरंगाबाद) तालुक्यासाठी दुष्काळी परिस्थितीत फळबागा वाचविण्यासाठी फळबाग पुनरुज्जीवन योजनेंतर्गत मंजूर कार्यक्रमानुसार सन २०१४-१५ करीता शेतकऱ्यांना रुपये ३४.४० लाख अनुदान वितरीत करण्यात आलेले आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात हेल्मेट घालण्याची सक्ती करण्यात आल्याबाबत**

**(४६) * १९०७६ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, नागपूर, औरंगाबाद पाठोपाठ पुण्यातही अचानक कोणतीही पूर्वसूचना न देता हेल्मेटसक्ती केली असल्यामुळे पुणे येथील जनतेत तीव्र संताप पसरला असल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, नागरीकांना हेल्मेटसक्ती अनिवार्य करण्यासाठी पूर्व सूचना देणे बंधनकारक असताना कोणतीही हेल्मेटसक्तीची पूर्वसूचना न देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१), (२) व (३) मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम १२९ नुसार फेटाधारण करणाऱ्या शीखधर्मीय व्यक्तीशिवाय इतर व्यक्तींना सार्वजनिक ठिकाणी दुचाकी वाहन चालवितांना ते चालविणाऱ्या व्यक्तीने व त्याच्या पाठीमागे बसलेल्या व्यक्तीस संरक्षक शिरोवेष्टन (हेल्मेट) परिधान करणे बंधनकारक आहे.

मा.उच्च न्यायालय तसेच मा.सर्वोच्च न्यायालय यांचेकडून प्राप्त आदेशानुसार महाराष्ट्र शासनाने दिनांक १७.१.२००५ रोजीच्या अधिसूचनेद्वारे मोटार वाहन कायदा, १९८८ च्या कलम १२९ मधील तरतुदींची महाराष्ट्र राज्याच्या संपूर्ण क्षेत्रात काटेकोर अंमलबजावणी करण्याचे आदेश जारी केले आहेत.

सबब, जानेवारी, २००५ पासून संपूर्ण महाराष्ट्र राज्याच्या मोटार सायकल चालविणाऱ्या किंवा तिच्यावरुन प्रवास करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीने सार्वजनिक ठिकाणी असतांना संरक्षक शिरोवेष्टन (हेल्मेट) वापरणे बंधनकारक आहे.

त्यानुसार पुन्हा परिवहन आयुक्त कार्यालयाच्या दिनांक ६.२.२०१६ रोजीच्या पत्राद्वारे सर्व परिवहन कार्यालयाना तसेच प्रसिध्दीपत्रकाद्वारे जनतेच्या माहितीसाठी संरक्षक शिरोवेष्टन (हेल्मेट) वापरणे बंधनकारक असल्याबाबत सूचित करण्यात आले.

मा.उच्च न्यायालय तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन होण्याच्या अनुषंगाने संरक्षक शिरोवष्टन (हेल्मेट) वापरणे कायद्याने बंधनकारक आहे. या संदर्भात मा.परिवहन मंत्री यांनी संबंधितांची बैठक घेऊन याबाबतची आवश्यकता स्पष्ट केली असता पुणेकर नागरीकांनी हेल्मेट वापराची मानसिकता स्विकारली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जळगाव जिल्हयात अवैधरित्या वाळू उपसा करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(४७) * १९१३१ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हयातील ४३ वाळू गटांची लिलाव प्रक्रिया पार पडत असतांना धरणगाव अमळनेर आदि तालुक्यातील १८ वाळू गटांना मात्र २/३ वेळा निविदा देऊनही प्रतिसाद मिळाला नसून वाळू उपसा सुरूच असल्याने संबंधित कर्मचाऱ्यावर जिल्हाधिकाऱ्यांनी निलंबनाची कारवाई केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, तद्नुसार विनापरवानगी वाळू उपसा करणाऱ्यांवर व सर्व संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), व (३) जळगांव जिल्हयात सन २०१५-१६ करीता एकूण ४४ वाळूगट निश्चित करण्यात आले असून, लिलावाच्या ४ फेऱ्यांमध्ये एकूण १८ वाळूगट गेले असून, ३ वाळूगटांसाठी निविदा प्राप्त झाल्या

असून, निविदा उघडून याकामी अंतिम निर्णय घेण्याची प्रक्रिया सुरू आहे.

जिल्हाधिकारी जळगांव यांनी मंडळ अधिकारी मारवाड ता. अंमळनेर यांनी कर्तव्यात कसूर केल्याच्या कारणास्तव निलंबित केले होते. त्यानंतर त्यांना पुनर्स्थापित करण्यात आले आहे.

जळगांव जिल्ह्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन/वाहतूकीस आळा घालण्यासाठी जिल्हा स्तरावर तसेच तालुका स्तरावर पथके गठीत केली आहेत. सदर पथकांनी सन २०१५-१६ मध्ये केलेल्या कारवाईत एकूण २८५७ प्रकरणात रू. ३,६०,५७,२७९/- एवढी दंडाची रक्कम वसूल केली आहे. तसेच ६९ व्यक्तींवर गुन्हे दाखल केले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**येवला व निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील कृषि वीज पंपासाठी वीज जोडणी देण्याबाबत**

**(४८) * १६४६१ श्री.जयवंतराव जाधव** : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्ह्यातील येवला व निफाड तालुक्यातील ४००० शेतकऱ्यांनी कृषि वीज पंपासाठी वीज जोडण्या मिळण्याकरिता सन २०१० पासून अनामत रक्कम भरूनही अद्यापपर्यंत शेतकऱ्यांच्या कृषि वीज पंपांना महावितरणकडून विद्युत पुरवठा करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यामध्ये ७०० मेगावॅट अतिरिक्त वीज असतांनाही नवीन वीज जोडणीसाठी रीतसर कोटेशन भरून अर्ज केलेल्या राज्यातील ४ लाख शेतकऱ्यांचे वीज जोडणी प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त वीज जोडणी प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(५) असल्यास, तदनुसार कृषि वीज पंपासाठी वीज जोडणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

दिनांक २९.२.२०१६ अखेर येवला तालुक्यात पैसे भरुन प्रलंबित असलेल्या कृषीपंप ग्राहकांची संख्या ३,७४६ इतकी असून फेब्रुवारी, २०१६ अखेर ३१३ कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्यात आले आहे. सन २०१०-११ मध्ये पैसे भरुन प्रलंबित असलेल्या कृषीपंप ग्राहकांची संख्या ३,०५२ इतकी आहे. तसेच, निफाड तालुक्यात फेब्रुवारी, २०१६ अखेर पैसे भरुन प्रलंबित असलेल्या कृषीपंप ग्राहकांची संख्या ७२६ इतकी असून फेब्रुवारी, २०१६ अखेर ५५३ कृषीपंपाचे ऊर्जीकरण करण्यात आले आहे. सन २०१०-११ मध्ये पैसे भरुन प्रलंबित असलेल्या कृषीपंप ग्राहकांची संख्या १४६ इतकी आहे. येवला व निफाड तालुक्यातील प्रलंबित कृषीपंपाना वीज जोडणी देण्याचे काम पायाभूत आराखडा-२ या योजनेअंतर्गत सुरु असून सदरचे काम मे.ई.एम.सी.जे.व्ही. श्रीनिवास इलेक्ट्रीकल्स यांना देण्यात आले आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

राज्यात जानेवारी, २०१६ अखेर २,०४,०५६ इतके कृषीपंप पैसे भरुन प्रलंबित आहेत.

(३) राज्यात मार्च, २०१५ अखरे एकूण १,७३,८५२ कृषी ग्राहक पैसे भरुन प्रलंबित होते. वर्ष २०१५-१६ मध्ये जानेवारी, २०१६ पर्यंत ९९,५८६ कृषी ग्राहक वीज जोडण्या देण्यात आलेल्या आहेत. प्रादेशिक असमतोल दूर करण्यासाठी शासनाने विदर्भ व मराठवाड्यासाठी विशेष पॅकेजअंतर्गत रु.८१९ कोटी मंजूर केले असून कामे प्रगती पथावर आहे. चंद्रपूर, गडचिरोली, ठाणे, पालघर, रायगड व रत्नागिरी जिल्ह्यांमध्ये अनुशेष योजनेतंर्गत वर्ष २०१५-१६ साठी रु.२२० कोटी मंजूर केले असून कामे प्रगतीपथावर आहे. तसेच पायाभूत आराखडा-२ व जिल्हानियोजन योजनेअंतर्गत कृषी वीज जोडणीचे कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) कृषीपंपाची कामे जलदगतीने करण्याकरिता :-

१) सर्व निविदांचे अधिकार स्थानिक स्तरावर देण्यात आले आहे.

२) मंडलनिहाय ऐवजी उपविभाग/शाखानिहाय निविदांची परवानगी स्थानिक स्तरावर देण्यात आली आहे.

३) जास्तीत जास्त कंत्राटदारांनी भाग घ्यावा व स्पर्धा वाढावी यासाठी निविदामधील शर्ती व अटी परिस्थितीनुसार शिथील करण्याचे अधिकार स्थानिक स्तरावर देण्यात आले आहे.

४) निविदा मधील दर जास्त असल्यास समिती मार्फत वाटाघाटी करण्याचे अधिकार स्थानिक स्तरावर देण्यात आले आहेत.

५) कृषीपंप ऊर्जीकरणाची कामे जलदगतीने होण्यासाठी मुख्य कार्यालय, प्रकाशगड, वांद्रे, मुंबई व तसेच परिमंडळ कार्यालयांमध्ये कृषीपंप नियंत्रण कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे. या नियंत्रण कक्षाद्वारे रोजच्या रोज मंडळनिहाय कृषीपंप ऊर्जीकरणाचा आढावा घेण्यात येतो. अशाप्रकारे कृषीपंपांची कामे करण्यासाठी सर्व आवश्यक उपाययोजना करण्यात आलेल्या आहेत.

-----------------

**कौसडी (ता.जिंतूर, जि.परभणी) येथील इनामी जमिनी प्रकरणी तहसिलदाराने केलेल्या गैरप्रकाराबाबत**

**(४९) * १६६७८ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कौसडी (ता.जिंतूर, जि.परभणी) येथील सेवा इनाम जमिन गट क्र. ५६५ मधील जमिनीबाबत मा.उच्च न्यायालय व मा.महसूल राज्यमंत्री यांनी आदेश देऊनही तहसिलदार वळवी यांनी गैरप्रकार केल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी प्रधान सचिव (अल्पसंख्याक) व प्रधान सचिव (महसूल) यांच्याकडे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान पुराव्यासह तक्रार नोंदविली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, इनामी जमिनी प्रकरणी तहसीलदार यांनी दिलेला निर्णय व केलेली कार्यवाही यांची वरिष्ठ स्तरावरून चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, तहसीलदाराचे निलंबन व धार्मिक स्थळ इदगाह यांचे संरक्षण याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अशा स्वरुपाची तक्रार लोकप्रतिनिधी कडून फेब्रुवारी, २०१६ महिन्यात प्राप्त झाली आहे.

(२) सदर तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडून वस्तुस्थितीदर्शक अहवाल मागविण्यात आला होता.

(३) जिल्हाधिकारी परभणी यांनी दि.२३.०३.२०१६ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेला अहवाल शासनास दि.२८.०३.२०१६ रोजी प्राप्त झाला आहे. सदर अहवालाची छाननी सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**गेवराई (जि.बीड) तालुक्यातील उपअधिक्षक, भुमि अभिलेख, कार्यालय येथील भुमापकाच्या गैरवर्तणुकीमुळे शेतकऱ्याने आत्महत्येचा इशारा दिल्याबाबत**

**(५०) * १७५२५ श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गेवराई (जि.बीड) तालुक्यातील उपअधिक्षक, भुमि अभिलेख कार्यालय येथील भुमापकाच्या जाचामुळे श्री.भिमा कुंडलिक देवकते, रा.विठ्ठलनगर या शेतकऱ्याने दिनांक १३ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास आत्महत्या करणार असल्याचा लेखी अर्ज या कार्यालयात दाखल केला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, सदर शेतकऱ्यांस त्रास देणाऱ्या भुमापकाविरुध्द कारवाई करण्याबाबत तसेच संबंधित शेतकऱ्यांला न्याय देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) श्री.भिमा कुंडलिक देवकते यांचा अशा आशयाचा दिनांक १४.१.२०१६ चा तक्रार अर्ज उप अधीक्षक, भूमि अभिलेख, गेवराई, जि. बीड हया कार्यालयास प्राप्त झाला आहे. तद्‌नुषंगाने केलेल्या चौकशीत पुढील बाबी स्पष्ट झाल्या आहेत.

राष्ट्रीय महामार्ग क्र. २११ साठी मौजे देवकी ता.गेवराई येथील गट क्र.१२६ मधील भूसंपादन करावयाच्या जमिनीबाबतचा संयुक्त मोजणी अहवाल उपजिल्हाधिकारी भूसंपादन जायकवाडी प्रकल्प, बीड यांच्याकडे पाठविण्यात आला होता. सदर अहवालात श्री भिमा देवकते यांच्या नावे ७ आर एवढे क्षेत्र दर्शविण्यात आले होते. तद्‌नंतर याबाबत उपजिल्हाधिकारी, भूसंपादन जायकवाडी प्रकल्प, बीड यांच्याकडे श्री भिमा कुंडलिक देवकते यांचे दोन भावांचे तक्रार अर्ज

प्राप्त झाल्यामुळे, सदर तक्रारीच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याच्या सूचना उपजिल्हाधिकारी भूसंपादन जायकवाडी प्रकल्प बीड यांनी उप अधीक्षक भूमि अभिलेख गेवराई यांना दिल्या होत्या. तद्नुषंगाने प्रत्यक्ष जागेवर जाऊन उप अधीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, गेवराई येथील निमतानदाराने केलेल्या चौकशीनुसार श्री भिमा कुंडलिक देवकते यांच्या नावे दर्शविण्यात आलेल्या ७ आर या क्षेत्राऐवजी ३.५० आर क्षेत्र अशी दुरुस्ती करण्यांत आली व त्यांचे बंधू श्री. रोहिदास देवकते आणि श्री.रंगनाथ देवकते यांचे नांवे प्रत्येकी १.७५ आर इतके क्षेत्र असल्याचा अहवाल दिनांक २७.८.२०१५ च्या पत्रान्वये उपजिल्हाधिकारी भूसंपादन जायकवाडी प्रकल्प,बीड यांना पाठविण्यांत आला होता. यानंतर श्री. भिमा देवकते यांच्या उक्त तक्रारीच्या अनुषंगाने उप अधीक्षक भूमि अभिलेख, गेवराई त्यांनी दिनांक ३.३.२०१६ रोजी प्रत्यक्ष जागा मोक्यावर जाऊन संपादनाधीन जमिनीच्या नकाशाच्या आधारे वस्तुस्थितीची खात्री केली. सदर मोजणीत उक्त दिनांक २७.८.२०१५ च्या संयुक्त मोजणी अहवालाव्दारे दर्शविण्यात आलेले क्षेत्र बरोबर असल्याचे निष्पन्न झाले असून त्यास श्री. भिमा देवकते यांनी संमती दर्शविली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अमरावती विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयांतर्गत कृषी सेवकाची भरती बिंदू नामावली मंजूर नसतांना भरती करण्यात आल्याबाबत

**(५१) * १७७४१ श्रीमती शोभाताई फडणवीस :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयांतर्गत सन २०१३ मध्ये १७० कृषी सेवकाची भरती बिंदू नामावली मंजूर नसतांना भरती करण्यात आल्याचे दिनांक २५ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) व (३) प्रस्तुत प्रकरणी कृषी आयुक्तालय स्तरावरुन चौकशी सुरु करण्यात आली आहे.

-----------------

**देगलूर (जि.नांदेड) तालुक्यात अवैध सिंधी विक्री होत असल्याबाबत**

**(५२) * १९१३९ श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देगलूर (ता.देगलूर, जि.नांदेड) हे शहर तेलंगणा व कर्नाटक राज्याच्या सीमेवर वसलेले असून शहरात सर्रासपणे अवैध सिंधी विक्री होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) माहे जानेवारी, २०१६ मध्ये देगलूर तालुक्यात अवैध ताडी विक्रीच्या २ घटना उघडकीस आल्या आहेत. परंतु देगलूर येथे सर्रासपणे अवैध ताडी विक्री होत असल्याची बाब खरी नाही.

(२) व (३) राज्य उत्पादन शुल्क विभाग, नांदेड यांनी जानेवारी, २०१६ मध्ये अवैध ताडी विक्रीच्या २ घटना उघडकीस आणल्या असून २ गुन्हे नोंदविले आहेत. सदर दोन्ही गुन्हे न्यायप्रविष्ट आहेत. देगलूर तालुक्यात अवैध सिंधी/ ताडी विक्री विरुध्द राज्य उत्पादन शुल्क विभागामार्फत प्रभावीपणे गुन्हे अन्वेषण करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**जळकोट (जि.लातूर) तालुक्यातील शेतकऱ्यांना पीकविम्याची मदत मिळणेबाबत**

**(५३) * १७३१४ श्री.सुभाष झांबड, श्री.हरिसिंग राठोड, डॉ.सुधीर तांबे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळकोट (जि.लातूर) तालुक्यातील ३१० शेतकऱ्यांनी दिनांक २६ जानेवारी, २०१६ रोजी (प्रजासत्ताक दिनी) आत्मदहन करण्याचा इशारा जिल्हाधिकाऱ्यांना दिला असल्याचे दिनांक १३ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शेतकऱ्यांनी सन २०१४ मध्ये खरीप हंगामासाठीचा पीक विमा स्टेट बँकेच्या हैद्राबाद जळकोट शाखेत उतरविला होता परंतू प्रशासनाच्या चुकीमुळे या शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम आजतागायत मिळाली नसल्याने त्यांनी संबंधित तहसिलदारांकडे रितसर तक्रार नोंदविली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय.

(२) होय.

(३) होय. चौकशीत आढळून आले की, खरीप हंगाम २०१४-१५ मध्ये जळकोट तालुक्यातील ३०२ शेतकऱ्यांनी स्टेट बँक ऑफ हैद्राबाद शाखा, जळकोट, जि.लातूर येथे खरीप पीक विम्याचा हप्ता भरुन योजनेत सहभाग घेतला होता. परंतु, सदर बँकेने घोषणा पत्रक (डीक्लरेशन फॉर्म) विहित मुदतीत भारतीय कृषी विमा कंपनीकडे सादर न केल्यामुळे म्हणजेच बँक प्रशासनाच्या चुकीमुळे संबंधित शेतकऱ्यांना अद्याप नुकसान भरपाई मिळालेली नाही. तथापि, स्टेट बँक ऑफ हैद्राबाद, शाखा जळकोट यांनी सुधारित प्रस्ताव भारतीय कृषी विमा कंपनीस सादर केलेला होता. सदर प्रस्तावास राज्य शासनाने मंजूरी दिलेली असून तो केंद्र शासनाकडे पाठवून संबंधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मंजूर करून घेण्याबाबतची कार्यवाही भारतीय कृषी विमा कंपनीमार्फत सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुरूड (जि.रायगड) तालुक्यातील वावडुंगी ग्रामपंचायत हद्दीतील सुतारमाळ आदिवासीवाडी येथे वीज पुरवठा करण्याबाबत

**(५४) * १६५५१ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरूड-जंजिरा (जि.रायगड) तालुक्यातील वावडुंगी ग्रामपंचायत हद्दीतील सुतारमाळ आदिवासीवाडी येथील ग्रामस्थांनी वीज पुरवठा करण्यासंदर्भात मागणी करून माहे जानेवारी, २०१६ पर्यंत वीज पुरवठा करण्यासंबंधात संबंधित विभागाने कोणतीच कार्यवाही केली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुतारमाळ आदिवासीवाडी येथे वीज पुरवठा करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) सुतारमाळ आदिवासी वाडीच्या आजूबाजूला जंगल असल्यामुळे विद्युत वाहिनी टाकण्यासाठी अडचण येत होती. सद्य:स्थितीत जंगलाच्या बाजूने विद्युत वाहिनी टाकणे शक्य झाले असल्याने सदर काम दिन दयाळ उपाध्याय ग्रामज्योती-१ या योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. या योजनेच्या प्रमाणित निविदा दस्ताऐवजास केंद्रशासनाची मंजूरी व निविदा प्रक्रिया महावितरण कंपनीमार्फत सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे झोडगे (ता.मालेगाव, जि.नाशिक) या गावात दारुबंदी करण्याबाबत

**(५५) * १६८३५ श्री.अशोक उर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.मुझफ्फर हुसेन सय्यद :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे झोडगे (ता.मालेगाव, जि.नाशिक) येथील गावात ग्रामस्थांनी दारुबंदी करण्याचा ठराव ग्रामपंचायतीने मंजूर करुन अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, नाशिक, प्रधान सचिव, राज्य उत्पादन शुल्क व दारुबंदी विभाग, मंत्रालय, प्रांताधिकारी, मालेगाव, तहसिलदार, मालेगाव, महिला आयोग, नाशिक व मालेगाव उपनिरिक्षक पोलीस कार्यालय, मालेगांव यांना दारुबंदी करण्याबाबतचे निवेदन देऊनही देशी दारु चे दुकान सुरु असल्याचे दिनांक १० जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, तद्नुसार ग्रामपंचायतीच्या दारुबंदी ठरावानुसार सदर गावातील देशी दारुचे दुकान बंद करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे** : (१), (२) व (३) मौजे झोडगे ग्रामपंचायतीचा दारुबंदीबाबतचा दि.२.१०.२०१५ रोजीचा ग्रामसभा ठराव तक्रार अर्जासह दि.१४.०१.२०१६ रोजी तसेच दि.२६.०१.२०१६ रोजीचा ग्रामसभा ठराव दि.२२.०२.२०१६ रोजी अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, नाशिक कार्यालयास प्राप्त झाला आहे.

या प्रकरणी चौकशी केली असता सदर ग्रामपंचायतीचे दोन्ही ग्रामसभा ठराव, शासन अधिसूचना, दि.२५.३.२००८ व दि.१२.०२.२००९ अन्वये दारुबंदीबाबत विहित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार पारित झालेले नसल्याने सदर सीएल-३ अनुज्ञप्ती बंद करण्याची कार्यवाही करण्यात आली नाही. तथापि तक्रारदार व झोडगे ग्रामपंचायतीचे उपसरपंच यांना दारुबंदीबाबत सदर शासन अधिसूचनान्वये विहित करण्यात आलेली कार्यपध्दती समजावून सांगण्यात आली आहे. त्यानुसार निवेदन / ठराव प्राप्त झाल्यास पुढील कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात खरीप हंगाम सन २०१४-१५ मध्ये दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळणेबाबत

**(५६) * १८६०५ डॉ.अपूर्व हिरे : दिनांक १५ डिसेंबर, २०१५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १ मधील प्रश्न क्रमांक ९४१९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यामध्ये खरीप हंगाम सन २०१४-१५ मध्ये ५० टक्के पेक्षा कमी पैसेवारी जाहिर झालेल्या गावातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना द्यावयाच्या नुकसान भरपाई पोटी सर्व विभागीय आयुक्तांच्या अंतीम मागणीच्या आधारे वितरीत करण्यांत आलेला निधी बाधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर वर्ग करण्याची प्रगती पथावरील कार्यवाही पुर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, सन २०१५-२०१६ मधील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभुमीवर सन २०१४-२०१५ मध्ये सर्वच बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई वाटप करण्यात आली आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अंशत: खरे आहे.
(२) होय. खरीप हंगामात जाहिर केलेल्या अंतिम पैसेवारीच्या ५० पैशापेक्षा कमी पैसेवारी असलेल्या बाधित गावातील शेतक-यांना नुकसान भरपाई देण्यात आली.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**जळगाव शहराच्या आदर्श नगर येथील आर.टी.ओ.कार्यालयातून जप्त केलेल्या वाहनातील स्पेअर पार्टची चोरी होत असल्याबाबत**

**(५७) * १९१३४ श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगाव शहराच्या उच्चभ्रू वस्तीत आदर्शनगर मध्ये असलेल्या आर.टी.ओ. कार्यालयात अनेक वाहने जप्त करून आणली जातात सदर वाहनांना कुठलीच सुरक्षा व्यवस्था नसल्याने तेथून वाहनातील भारी किमतीचे स्पेअर पार्ट चोरीला जात असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जप्त केलेल्या वाहनांच्या स्पेअर पार्ट चोरीमुळे वाहनधारकास त्याचा त्रास होत असून त्यामुळे एका युवकाने त्याच्या वाहनातून स्पेअर पार्ट चोरीला गेल्यामुळे आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,
(४) असल्यास, तद्‌नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) नाही. तथापि, गुन्ह्यात जप्त करण्यात आलेली वाहने ही पोलीस स्टेशनच्या आवारात किंवा एस.टी. महामंडळाच्या आवारात अटकावून ठेवण्यात येतात.
(२) उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, जळगाव यांच्या वायुवेग पथकाने दिनांक २३.१२.२०१५ रोजी अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या एमएच १९ एएक्स ३२३६ या

वाहनावर कारवाई करुन तालुका पोलीस स्टेशन, जळगाव येथे वाहन चालक व मालक यांच्या जबाबदारीवर अटकावून ठेवले. सदर वाहन श्री.सुधाकर पांडूरंग पाटील, रा.विखरण, ता.एरंडोल, जि.जळगाव यांचे नावावर आहे. सदर प्रकरणात एक त्रयस्थ व्यक्ती नामे श्री.स्वप्नील कुळकर्णी रा.पाळधी, यांनी सदर वाहन हे स्वत:चे भासवून, सदर वाहनातील स्पेअर पार्ट चोरी गेल्या कारणाने आत्मदहनाचा प्रयत्न केला होता.

(३) व (४) श्री.स्वप्नील कुळकर्णी या व्यक्तींचा अटकावून ठेवलेल्या वाहनाशी कुठलाही संबंध नसल्याने सदर व्यक्तींविरुध्द पोलीस स्टेशन, जळगाव येथे गुन्हा.७/२०१६ अन्वये नोंदविला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :** **उत्तमसिंग चव्हाण**
**मुंबई.** **सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.